
मिलिंद कुलकर्णी
भय
इथले संपत नाही
The Endless Fear...
12

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

भय

इथले संपत नाही

मिलिंद सीताराम कुलकर्णी

भय इथले संपत नाही

लेखक: मिलिंद सीताराम कुलकर्णी

‘पुणे.

8171030307

milindslkulkarni@rediffmail.com

मुखपृष्ठ- गौरव कुलकर्णी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १३ जुलै २०२६ (सोमवती अमावास्या)

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १६०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडून छपाईचा खर्च म्हणून स्विकारली जाईल.)
(संपर्क- मिलिंद सीताराम कुलकर्णी – 8171030307

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

मी मिलिंद सीताराम कुलकर्णी

जन्मतारीख : २५ मार्च १९७२.

सध्या पुणे येथे एका कंपनीमध्ये प्रोडक्शन मॅनेजर.

नोकरी निमित्त पंत-नगर (रुद्रपूर) उत्तराखंड येथे दहा वर्षे वास्तव्यास.

कदम-वाडी (कोल्हापूर.),

निपाणी येथे संपूर्ण परिवार, आई वडील आणि भाऊ.

मातृ भाषा कन्नड, आई: विजापूर- कर्नाटक. पण वडिलांची नोकरी महाराष्ट्रात झाल्यामुळे मराठीमध्ये शिक्षण झाले. हायस्कुल मधल्या मराठीच्या आवडत्या शिक्षकांमुळे मराठीची आवड निर्माण झाली. त्यांच्या सारखेच शिक्षक होण्याची स्वप्ने होती पण झालो इंजिनियर.

लहानपणापासून पुस्तके वाचनाची आणि चित्रकलेची आवड. त्यातूनच थोडेफार लिखाणाची सवय लागली. कॉलेज मध्ये असताना पहिली कथा सुचली आणि लिहिली. त्यानंतर नोकरी निमित्त जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगावी, रुद्रपूर (उत्तराखंड), पुणे असा प्रवास करत लिखाणाचा प्रवास देखील हळूहळू चालू ठेवला.

काटा किर्रर्र, भेटी लागी जिवा आणि भोग अशी यापूर्वी प्रकाशित झालेली पुस्तके; अर्थात ई-साहित्य वरच.

milindslkulkarni@rediffmail.com

मनोगत :-

नमस्कार,

माझे चौथे पुस्तक आपल्यासमोर सादर करतेवेळी आनंद होत आहे.

पण माझ्या आनंदाच्या क्षणाला दु:खाची झालर आहे.

माझे तिसरे पुस्तक मार्च २०१८ मध्ये प्रकाशित झालेले. त्यानंतर आठ वर्षांनी प्रकाशित होतंय.

आयुष्यात एक घटनाच अशी घडून गेली कि लिखाणाचे काम पूर्णपणे ठप्प झाले. माझी जीवन साथी लता या जगातून दूर निघून गेली आणि मी सुद्धा माझ्या लिखाणछंदापासून दूर गेलो.

मनात असूनही काही लिहीत नव्हतो, आणि लिहिलेल्या सामग्रीकडे लक्ष देत नव्हतो, असेच पडून होते.

माझा मुलगा गौरव सारखे लिखाणाचा विषय काढायचा आणि लिखाण सुरु ठेवा म्हणून सांगायचा.

त्याचे वारंवार सांगणे पुन्हा मनावर घेतले आणि पेन-कागद हातात घेतला; साधारण पाच-सहा वर्षानंतर...

पूर्वी कथा पूर्ण झाली कि मी माझी पत्नी लताला दाखवायचो. ती पण मनापासून वाचायची, त्यावर माझ्याशी तासंतास चर्चा करायची.

आपला अभिप्राय कळवायची, दोन्ही पण; आवडल्याची आणि नाही आवडल्याची.

एक आठवण सांगतो, मी एक कथा लिहिलेली, पूर्ण झाल्यानंतर अर्थातच तिला वाचायला दिली. तिने पूर्ण वाचली, आणि भावनिक झाली. बराच वेळ आमच्यात चर्चा झाली.

“लिखाण छान झालंय पण नायिकेवर अन्याय झालाय असे मला वाटते. तुम्हीच ठरवा काय करायचे ते”. असे म्हणाली.

मनाला खटकले आणि मी पुन्हापुन्हा ती कथा वाचली, मला पण तिचे म्हणणे पटले, काही तरी राहिलंय...

रात्री साडे दहानंतर पुन्हा लिहायला बसलो, पहाटे चार वाजेपर्यंत कथा लिहिली. कॉम्पुटर वर उतरवली आणि सकाळी ऑफिसला निघतेवेळी ‘कॉम्पुटर वरची कथा वाचून ठेव संध्याकाळी चर्चा करू’ म्हणालो आणि गेलो.

तिने तासाभरात फोन केला आणि अभिप्राय दिला, शेवट सुंदर झालाय म्हणून रडतच बोलली.

'भेटी लागी जिवा' या माझ्याच पुस्तकामध्ये प्रकाशित झालेली "तेथे तुझी मी वाट पाहते" हि कथा, उत्तरार्ध घेऊन जन्माला आली. एकाच कथेचे चार वेगवेगळे शेवट, एक अनोखा प्रयोग....

केवळ तिच्यामुळेच!

असो..., तर आता या कथासंग्रहाच्या रूपाने काही कथा; वाचक-परिवारासमोर समोर मांडतोय...

आपला अभिप्राय ऐकून घेण्यासाठी; दोन्हीही आवडल्याचा आणि नाही आवडल्याचा....

आपला अभिप्राय हीच आता माझी पुढील लिखाणासाठीची ऊर्जा ....

मला पुन्हा लिहिण्यासाठी प्रोत्साहित करणारा माझा मुलगा गौरवचे आभार. या पुस्तकांमधले ग्राफिक्स फोटो हि पण गौरवचीच आयडिया ....

माझ्या कथा प्रकाशनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल सुनील सामंत जी आणि टीम ई-साहित्य चे आभार.

धन्यवाद,

मिलिंद सीताराम कुलकर्णी.

पुणे.

8171030307

milindslkulkarni@rediffmail.com

रुसवा असा कसा हा ज्या आपलें कळेना?

अजुनी रुसून आहे खुलतां कळीं खुलेना !

माझी जीवनसाथी, मार्गदर्शक लता (सोनू) हिला

हे पुस्तक प्रेमपूर्वक अर्पण .....

अनुक्रम

१, हम यहाँ हूँ सरजी, आपके पीछे ...

२, बुधवार: तारीख बारा ऑक्टोबर ...

३. एक लिफाफा, अव्यक्त प्रेमाचा ...

४. ही वाट दूर जाते ...

५. वचनबंदी ....

या कथासंग्रहातील सर्व कथा, स्थळे व व्यक्ती, घटना काल्पनिक आहेत. कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा व्यक्तीशी साम्य आढळल्यास तो योगायोग असेल.

या कथांद्वारे कोणत्याही प्रकारे अंधश्रद्धांना उत्तेजन देण्याचा हेतू नाही. केवळ मनोरंजन म्हणून या कथा वाचाव्या.

हम यहां हूँ सरजी, आपके पीछे....!

'सप्तर्षी टॉवर्स'च्या गेटमधून ती पांढरीशुभ्र नवीकोरी होंडासिटी आत येताच गेटवरच्या सेक्युरिटी-गार्डने सॅल्यूट ठोकला. इतर दोन वाचमनसह, केबिनमधले दोघे गार्डदेखील उठून उभे राहिले. ती कार गेटमधून पार्किंगकडे निघताच, पाठोपाठ एक वाचमन पळत गेला, आणि कारचा दरवाजा उघडला.

सप्तर्षी टॉवर्सच्या दहाव्या मजल्यावर असणाऱ्या 'हिमालय कन्स्ट्रक्शन' ऑफिसच्या रिसेप्शन टेबलवरची फोनची रिंग वाजली. रिंग वाजताच, रिसेप्शनिस्टने रिसिव्हर उचलून कानाला लावला आणि सेक्युरिटी गार्डचा आवाज ऐकून, "ओके, थँक यु!" म्हणत पटकन फोन ठेवला. टेबलवरच्या पेपर्सची, फाईलींची आवराआवर करताकरता

रिसेप्शनिस्टने सगळ्यांना ओरडून, "सर आले - - -!" असे सांगताच, ऑफिसमधले आपापल्या जागी जाऊन कामाला लागले.

वॉचमनने कारचा दरवाजा उघडताच विश्वनाथ बाहेर आले. त्याच्या सोबत असणारी व्यक्तीसुद्धा कार मधून उतरली. मागच्या सीटवर ठेवलेली लॅपटॉपची बॅग वॉचमनने हातात घेतली, लिफ्टपर्यंत गेला आणि लिफ्ट कॉल केली. लिफ्ट येताच लिफ्टमध्ये बॅग ठेवली, पाठोपाठ विश्वनाथ आणि त्याच्या सोबत असणारी व्यक्ती लिफ्टमध्ये गेले.

बारा मजले असणाऱ्या सप्तर्षी टॉवर्सच्या दहाव्या मजल्याच्या दिशेने लिफ्ट निघाली.

*****

सहा फुटपेक्षा जास्त उंची, तब्बेतीने धिप्पाड, काळेसावळे, डोक्यावर बारीक केस. लालसर डोळ्यांवर चंदेरी रंगाची फ्रेम असलेला महागडा चष्मा, गळ्यात सोन्याची चेन, हातात ब्रेसलेट. पांढरा-शुभ्र शर्ट, क्रिम कलरची कॉटन जीन-पॅन्ट घातलेले साधारण अडतीस-चाळीस वयाचे, विश्वनाथ लिफ्टचा दरवाजा उघडताच बाहेर आले.

आधीच वाट बघत लिफ्टच्या शेजारी उभ्या असलेल्या ऑफिस-बॉयचा नमस्कार स्वीकारून विश्वनाथ सोबतच्या व्यक्तीसोबत आपल्या हिमालय कॅन्स्ट्रक्शनच्या ऑफिसमध्ये निघाले.

*****

हिमालय कन्स्ट्रक्शनचे एम.डी. विश्वनाथ, ऑफिसमध्ये येताच, रिसेप्शनिस्ट, 'गुड मॉर्निंग सर' म्हणत उठून उभी राहिली. तिच्याकडे पाहून

बसण्यासाठी हात करत, चेहऱ्यावरचे गंभीरभाव न-बदलता सर्वांचा गुड मॉर्निंग स्वीकारत ते आपल्या केबिनकडे गेले.

केबिनसमोर जाताच पुन्हा मागे फिरले आणि, सर्वांकडे पहात, "फ्रेंड्स, इकडे लक्ष द्या." असे म्हणताच, सर्वजण विश्वनाथ समोर आले.

"यांना भेटा मिस्टर विक्रम, माझा लहान भाऊ. आमच्या गावाकडे असतो, पण इथून पुढे आपल्या सोबत असतील, आपल्या कंपनीचे डायरेक्टर म्हणून." विश्वनाथ सरांनी ओळख करून दिली.

विश्वनाथ प्रमाणेच काळेसावळे, पण थोडी कमी उंची, आणि किडकिडीत. बारीक दाढी वाढलेली, जाडजूड आकडी मिशी, एकदम रांगडा गावठी बाज; कपाळावरून डाव्या गालापर्यंत जाणारी जखमेची खूण. डोळ्यांवर काळा गॉगल, डोक्यावर टोपी, अंगात भडक निळ्या रंगाचा टीशर्ट, जीनपँट घातलेल्या विक्रमकडे पाहून सर्वजण, 'गुड मॉर्निंग, अँड वेलकम सर!' म्हणत काही सिनिअर त्यांच्या हातात हात मिळवण्यासाठी पुढे आले.

थोडे मागे सरकत, 'नो फॉर्मेलिटीज, धन्यवाद' म्हणून सगळ्यांच्यावर नजर फिरवत, स्मित हसत विक्रमने हात जोडले.

"हे आपल्या त्या विकीसरांच्या म्हणजे विक्रांतच्या केबिन मधेच बसतील. हळूहळू कामाची माहिती घेत, त्यांची जबाबदारी सांभाळतील. यांनापण तुम्ही सर्वजण विकीसर म्हणून बोलावले तरी चालेल, आणि मी आशा करतो; त्यांच्याप्रमाणेच यांनाही तुम्ही सहकार्य कराल." असे सांगत असतानाच विश्वनाथ हळवे झाले आणि चष्मा काढून हातातला रुमाल डोळ्यांवर लावत 'सॉरी' म्हणत मागे फिरले.

विक्रम त्यांना सांभाळत त्यांच्या केबिन मध्ये घेऊन गेले. गंभीर झालेल्या वातावरणात सगळेजण शांतपणे आपापल्या जागेवर जाऊन बसले.

ते विकीसर म्हणजे विक्रांतसर गेल्यापासून विश्वनाथसर फारच हळवे झाले होते. कारणही तसेच होते.

*****

हिमालय कन्स्ट्रक्शन ही फर्म विश्वनाथसरांनी सात-आठ वर्षांपूर्वी सुरु केली होती. चार-पाच वर्षांपासून त्यांना विकीसरांची म्हणजे विक्रांतची साथ मिळाली आणि कंपनी जोरात चालली. सप्तर्षी टॉवर्स पण त्यांचाच प्रोजेक्ट, आत्तापर्यंतच्या प्रोजेक्टमधला सगळ्यात मोठा! बारा मजली भव्य आणि आलिशान व्यावसायिक प्रकल्प, म्हणजेच या प्रोजेक्टमध्ये कमर्शियल ऑफिसेस आणि शॉप्स होते.

प्रोजेक्ट लॉन्च होताना जसा अंदाज होता तसा रिस्पॉन्स मिळाला नाही म्हणून दोघेही तणावात होते. दीड-दोन महिन्यापूर्वी, त्या प्रोजेक्टच्या मार्केटिंगसाठी विकिसर कार घेऊन परगावी चालले होते. रात्रीचे नऊ वाजून गेले होते, जवळच्याच तांबडी घाटात अचानक कारने पेट घेतला आणि दरीत कोसळली. विकिसर त्या जळत्या कार सोबतच दरीत कोसळले आणि गेले. जळालेल्या कारमध्ये विकिसरांचा हाडांचा सांगाडा जळालेल्या अवस्थेत मिळाला.

*****

‘आताचे विकीसर दिसायला साधारण त्या विकिसरांसारखेच दिसतात, पण त्या विकिसरांचा एक वेगळाच रुबाब होता. ऑफिसात आणि साईटवर येताना ते टी-शर्ट घालून कधीच येत नव्हते, नेहमी फॉर्मल शर्ट-पॅन्ट-शूज असा टापटीपपणा त्यांच्यात असायचा. त्यांची एक वेगळीच शिस्त होती, पण सगळ्यांशी मिळून मिसळून वागायचे. पण या विकिसरांच्या चेहऱ्यावरून आणि पेहेरावावरून तसे वाटत नाहीत. हे शिस्तीचे नसले तरी चेहऱ्यावरून कडक वाटतात.’ दोघेही केबिनमध्ये जाताच स्टाफची आपापसात चर्चा सुरु झाली.

"नवीन माणसाची जुन्याशी तुलना होणे स्वाभाविकच आहे, पण काही दिवस एकत्र काम केल्यानंतर तुलना केलीत तर बरे होईल नाही?" स्टाफच्या नकळत त्यांची चर्चा ऐकत केबिनच्या दारात उभे असलेले विकीसर एकदम बोलून गेले आणि त्यांचा करारी चेहरा पाहून सर्वजण ओशाळले.

"मी गबाळा, खेडवळ वाटत असलो तरी माझी विचार करण्याची पद्धत वेगळी आहे, विक्रांतची कदाचित वेगळी असेल. मला काम महत्त्वाचे वाटते; दिखाऊपणा नाही. म्हणून सर्वांनी नसत्या फालतू गप्पांकडे ध्यान देण्यापेक्षा कामाकडे ध्यान द्या, अंडरस्टूड?" असे म्हणत विकिसरांनी काहीवेळ संपूर्ण ऑफिस न्याहाळले आणि आपल्या म्हणजे विक्रांतच्या केबिन मध्ये गेले.

विकीसरांच्या पहिल्याच प्रतिसादाने हादरलेले सर्वजण 'सॉरी सर' म्हणत आपापल्या कामाला लागले.

*****

काही वेळानंतर, टेबलवरचा फोन वाजताच विश्वनाथसरांनी उचलला; तर, “सर, रघुवीरप्रसाद आलेत.” रिसेप्शन काउंटरवरून रिसेप्शनिस्ट बोलत होती.

“क्काय ?” स्वतःला सावरत विश्वनाथ बोलले, “म्हणजे, क्कोण हा रघुवीरप्रसाद? आणि काय काम आहे त्याचे?”

“सर, रघुवीरप्रसाद विश्वकर्मा, आपल्याकडे गवंडी काम करतात, आपल्या शुक्रतारा हौसिंग प्रोजेक्ट्मधे. आपल्याला भेटायचंय म्हणतात ते.” - रिसेप्शनिस्ट.

“नको नको, मी मिटिंग मध्ये आहे म्हणून सांगा त्यांना. मी बोलवतो माझे हातातले काम झाल्यावर.” -विश्वनाथ हातातला फोन ठेवत.

समोरच्या ग्लासमधले पाणी पिऊन, पुन्हा फोन उचलला. चीफ इंजिनिअरकडून प्रोजेक्ट्सची माहिती घेत असलेल्या विकीच्या केबिनमधला फोन वाजला.

"विकी, ताबडतोब माझ्या केबिनमध्ये ये." विश्वनाथ.

इंजिनिअरला बाहेर जाण्यास सांगून, विकी पटकन विश्वनाथच्या केबिन मध्ये गेला, आणि "काय झाले भैय्या?" असे म्हणताच.

"अरे विकी तो रघुवीरप्रसाद आलाय म्हणे!" -विश्वनाथ नॅपकिनने चेहरा पुसत म्हणाले. "क्काय? म्हणजे रघुवीरप्रसाद विश्वकर्मा? कसं शक्य आहे? आणि नक्की तोच आहे ना?" - असे म्हणत विकी पटकन समोरच्या खुर्चीत बसला.

काहीच न-बोलता दोघेही बराच वेळ शांतपणे बसून राहिले.

अचानक, "मी बघून येतो, नक्की तोच आहे का?" असे म्हणून विकी उठून केबिनच्या बाहेर गेला. आणि रिसेप्शन टेबलच्या दिशेने पाहू लागला, पण तिथे रघुवीरप्रसाद दिसलाच नाही.

रिसेप्शनिस्टला विचारले तर, 'आत्तातर तो इथेच होता सर. कदाचित बाहेर थांबला असेल पहाते.' रिसेप्शनिस्ट ऑफिसच्या बाहेर पहायला गेली. विकी त्याला इकडे तिकडे शोधू लागला, पण कुठेच दिसत नव्हता.

रघुवीरप्रसादला शोधणाऱ्या विकीला, मागून भस्सकन दारूचा उग्र वास आला. म्हणून मागे वळून पहातो तर, विकिच्याच उंचीचा जुनाट मळके कपडे घातलेला, डोक्याला टॉवेल बांधलेला, काळासावळा किडकिडीत रघुवीरप्रसाद; अस्तव्यस्त वाढलेली दाढी डाव्या हाताने खाजवत विकीकडेच रोखून पहात होता.

"हम यहां हूँ सरजी, आपके पीछे...." तंबाखूमुळे काळे-पिवळे झालेले दात दाखवत, हसत म्हणाला.

त्याला पहाताच घाबरलेला विकी पटकन विश्वनाथच्या केबिन मध्ये गेला. आणि त-त-प-प करत गपकन खुर्चीवर बसला. खिशातला रुमाल काढून घाम पुसत, विश्वनाथकडे भेदरलेल्या नजरेने पहात टेबलवर ठेवलेला पाण्याचा ग्लास उचलून गटागटा पाणी पिऊ लागला. विकीची झालेली अवस्था पाहून तो रघुवीरप्रसादच असल्याची विश्वनाथना खात्री पटली. दोघांनाही दरदरून घाम फुटल्याने रिमोटने एसीचा थंडावा वाढवला.

निःशब्द होऊन दोघेही एकामेकाकडे पहात बसले. एवढ्यात केबिनच्या पार्टीशनच्या भिंतीवर जोरात धाड-धाड धाड-धाड असे वाजले!!!

दचकून दोघेही तिकडे पहातात तर कोणीतरी बाहेरच्या बाजूला केबिनच्या काचेवर हात ठेवून, आतमध्ये त्यांच्याकडेच रोखून पहात असल्याचे अंधुकसे दिसले.

केबिनच्या काचेतून बाकीचा स्टाफ स्पष्टपणे दिसत होता.

हे अंधुकसे दिसणारे कोण असेल ???

काचेवर ठेवलेल्या हातातून वाहणारे रक्त काचेवर ओघळू लागले.

"भैय्या हा रघुवीरप्रसाद, आपल्यालाच पहातोय!"

असे ओरडत विकीने केबिनचे पडदे ओढून घेतले.

आतून लॉक असणाऱ्या केबिनच्या दरवाज्यावर कुणीतरी टक-टक करताच, घाबरत विकीने दरवाजा उघडला. अकाउंटंट परवानगी घेऊन आत आले आणि विश्वनाथकडे पहात, "सर, तो रघुवीरप्रसाद विश्वकर्मा आलाय, आपल्याला भेटायचंय म्हणतोय."

"कशाला आलाय तो ?" - विश्वनाथ घाबरून.

"सर, त्याला पगार आणि काही रक्कम ऍडव्हान्स पाहिजे, त्यासाठी तुम्हाला भेटायचंय म्हणतोय. पाठवू ?" -अकाउंटंट.

"नको नको. किती दिवसांचा पगार द्यायचाय त्याचा?" - विकी.

"सर, रोजच हजर आहे तो. विकीसर म्हणजे विक्रांत सर गेले त्या दिवशी फक्त अबसेन्ट होता. आणि दोन महिने पगारच घेतला नाही त्याने." - अकाउंटंट.

"ठीक आहे जास्त चर्चा नको, जे काही पैसे मागतोय ते देऊन टाका, माझ्याकडे आणू नका त्याला." - विश्वनाथ बोलून गेले, आणि अकाउंटंट परत बाहेर गेले.

केबिनचा दरवाजा आतून बंद करून, कपाळावरचा घाम पुसत विकी पुन्हा खुर्चीवर बसला.

संध्याकाळचे सहा वाजून गेले तरी दोघेही तसेच बसून होते. एकएक करून सारा स्टाफ आपापल्या घरी गेला. आता फक्त दोघेच ऑफिसमध्ये बसले होते, तेसुद्धा बंद केबिनमध्ये!

'रघुवीरप्रसाद पण आपला पगार घेऊन गेला असेल, आता निघायला हवं.'

असा विचार दोघांच्याही मनात आला.

एवढ्यात पुन्हा धाड-धाड असा केबिन वाजवल्याचं आवाज आला. केबिनच्या बाहेर लक्ष गेले तर, बाहेरून कुणाची तरी सावली पडद्यावर पडलेली स्पष्टपणे दिसत होती.

दोघांनाही बाहेर जाण्याचे धाडस होत नव्हते. पुढे काय करावे काहीच कळत नसल्याने दोघेही हात डोक्याला लावून बसले होते.

"भैय्या, घरी जायचं ना?" या विकीच्या प्रश्नाने विश्वनाथ भानावर आले.

पहातात तर साडेसात वाजून गेलेले, बाहेर बऱ्यापैकी अंधार पडलेला.

आणि केबिनच्या बाहेर दोघांचेही लक्ष गेले तर,

तर पडद्यावर दिसणारी सावली तशीच होती, म्हणजे तोसुद्धा तसाच थांबला होता,

रघुवीरप्रसाद विश्वकर्मा; आपले रक्ताळलेले दोन्ही हात केबिनच्या काचेवर ठेवून, दोन पडद्यांच्या मधून आतमध्येच पहात उभा होता, त्या दोघांकडे...

"भैय्या, घरी कसे जाणार? केबिनच्या बाहेर कसे जाणार?" – घाबरलेला विकी.

काहीच न-बोलता विश्वनाथने फोन उचलला आणि गेटवरच्या गार्डना बोलावून घेतले.

गार्डच्या बुटांचा आवाज ऐकताच त्यांना गार्ड आल्याचे कळले.

खात्री होताच घाबरत घाबरत केबिनचा दरवाजा उघडला. समोर दोन गार्ड थांबले होते.

"कोणी आहेत का ऑफिसमध्ये, म्हणजे अजूनही थांबलेले?" नकळत विकीने वाचमनला विचारले.

"नाही सर, एक-दीड तासापूर्वीच सर्वजण निघून गेलेत." - सेक्युरिटी गार्ड.

दोघेही केबिनबाहेर येऊन दोन्ही गार्डच्या मधून निघाले. तिकडे पाहतात तर रघुवीरप्रसाद डोक्यावरचा टॉवेल काढून केबिनच्या काचेवर ओघळणारे रक्त पुसत थांबला होता.

अंधुकसा दिसणारा! दोघांकडे रोखून पहात होता, रागाने!!!

विश्वनाथने गार्डना कारपर्यंत आपल्यासोबत येण्यास सांगून, त्वरित निघाले. केबिन आणि ऑफिसचे लाईट्स बंद करून गार्डने कुलूप लावले.

आणि चौघेही पार्किंगकडे निघाले.

दोघेही कारमध्ये बसताच, विश्वनाथनी पार्किंग मधून भर्रकन कार बाहेर काढली आणि गेटमधून बाहेर पडून वेगात आपल्या घराच्या दिशेने निघाले.

“हम यहां हूँ सरजी, आपके पीछे....” पाठीमागून आवाज येताच विकी घाबरला आणि जोरात किंचाळत मागे पाहू लागला.

मागच्या सीटवर तर कोणीच नव्हते.

विकीकडे पाहून दचकलेले विश्वनाथ," एव्हढा पॅनिक होऊ नको विकी, घाबरायला काय झाले." दिवसभरात घडलेल्या प्रसंगांमुळे असा भास झाला असेल म्हणून दोघेही शांत बसले.

घरी पोहोचताच विकीने कारमधून उतरून गेट उघडले, विश्वनाथने कार आतमध्ये लावली. विकी गेट बंद करून येईस्तोवर विश्वनाथ कार मधून उतरून दरवाज्याचे कुलूप काढू लागले.

कारमध्ये ठेवलेला लॅपटॉप घेण्यासाठी विकीने घाबरत घाबरत कारचा मागचा दरवाजा उघडला.

“हम यहां हूँ सरजी, आपके पीछे....” पाठीमागून आवाज आला म्हणून विकीने पाठीमागे वळून पहिले, तर कोणीच नव्हते.

हातातला लॅपटॉप सावरत विकीने धाडकन कारचा दरवाजा बंद केला, त्याला कारमध्ये हालचाल जाणवली, म्हणून तो जोरात ओरडला,

"भैय्या, भैय्या, तो इथेच आहे; आपल्या कारमध्येच आहे." विश्वनाथ पळत बाहेर आले.

दोघेही कारकडे पाहू लागले.

रघुवीरप्रसाद आपले रक्ताळलेले हात खिडकीच्या काचेवर ठेवून कारमधून बाहेर रोखून पहात होता. त्या दोघांकडे...

काचेवर ठेवलेल्या दोन्ही हातातून वाहणारे रक्त काचेवर ओघळू लागले.

दोघेही पळत आपल्या घरात गेले आणि घराचा दरवाजा बंद करून घेतला. दोघांनाही दरदरून घाम फुटला होता म्हणून फॅन लावला, खिडकीचे पडदे लावून घेतले.

असे भयंकर काही घडेल याचा विचारच केला नव्हता. हे सत्य आहे कि भास आहे कळतच नव्हते. आणि हे कधीपर्यंत घडणार, पुढे काय होणार काहीच कळत नव्हते.

दोघेही विचार करत सोफ्यावर समोरासमोर बसून होते.

आपल्याच तंद्रीत...

*****

विक्रांत गेल्यानंतर त्याचे संस्कार-विधी करण्यासाठी गावाकडे गेलेल्या दोघांच्याही पत्नी अजूनही गावीच होत्या. विश्वनाथ आणि विक्रम दोघेच परत आलेले, त्यामुळे यांच्याशिवाय इथे घरी कोणी नव्हते. जुनी कार अपघातात जळून गेल्यामुळे नुकतीच नवीन कार घेतलेली, होंडासिटी.

*****

दारावरची बेल वाजली, आणि दोघांची तंद्री भंगली...

भानावर येऊन दोघेही एकमेकांकडे पाहू लागले. पुन्हा एकदा बेल वाजली. यावेळी बेल बराच वेळ वाजत होती. विकी दरवाजा उघडण्यासाठी गेला, पाठोपाठ विश्वनाथही गेले.

दरवाजा उघडताच ऑनलाईन मागवलेले जेवण घेऊन एक डिलेव्हरी-बॉय समोर उभा होता. त्याच्याकडून जेवणाचा डबा घेऊन, त्याचे पैसे देत असताना दोघांनाही कारमध्ये काहीतरी हालचाल जाणवली.

पाहतात तर रघुवीरप्रसाद डोक्यावरचा टॉवेल काढून कारच्या काचेवर ओघळणारे रक्त पुसत थांबला होता.`

अंधुकसा दिसणारा! दोघांकडे रोखून पहात होता, रागाने!!!

घाबरून दरवाजा बंद करून घेतला. सगळ्या खिडक्या बंद असल्याची खात्री केली आणि पडदे ओढून घेतले. भूक लागली असूनसुद्धा जेवण जात नव्हते. एकमेकांशी काही न-बोलता जेवण आवरले.

घाबरलेला विकी विश्वनाथच्या बेडरूममध्येच झोपला.

संपूर्ण दिवसभर घडलेले प्रसंग डोळ्यासमोरून हलतच नव्हते.

रात्री काहीही विपरीत न-घडता सकाळ झाल्याचे जाणवले...

पण घराबाहेर जाण्याचे धाडस दोघांनाही होत नव्हते. जेवणाचे पार्सल घेण्यापुरते दरवाजा उघडत होते. पार्सल घेत असता कारकडे पाहायचे पण तो दिसायचा नाही. रघुवीरप्रसाद...

कारच्या खिडक्यांच्या काचा साफ दिसत होत्या. आत्ताच पुसल्यासारख्या...

*****

पुढचे दोन दिवस दोघेही घाबरून घरीच राहिले.

"विकी, किती दिवस घरातूनच काम करणार आपण? ऑफिसला, साईटवर जायलाच लागणार.” उद्या जाऊ साईटवर आपण." दोन-तीन दिवस घाबरून घरीच थांबल्यानंतर तिसऱ्या

दिवशी विश्वनाथ विकीला सांगत होते.

*****

‘शुक्रतारा रेसिडेन्सी' या आपल्या चालू असलेल्या साईटवर जाण्यासाठी दोघेही तयार होत होते. एवढ्यात विश्वनाथचा फोन वाजला.

"- - - - -".

“क्काय ? कुणाला काही इजा तर नाही झाली ना?" घाबरून विश्वनाथनी विचारले आणि,

"ठीक आहे, पोहोचतो लगेचच." म्हणत बाहेर आले.

"विकी आपल्याला साईटवर जायला हवे ताबडतोब "म्हणत कारची चावी घेतली आणि निघाले.

"आपल्या, शुक्रतारा रेसिडेन्सी साईटवर अपार्टमेंटच्या गॅलरीचा एक स्लॅब तुटून पडला म्हणे,

साईट इंजिनिअरचा फोन होता. आपला एक कामगार सिरीयस आहे, ऍम्ब्युलन्स बोलावून दवाखान्यात पाठवलाय."

बी विंगच्या चौथ्या मजल्याच्या बाल्कनीचा एक भाग कोसळून पडला होता. विश्वनाथ सरांना पाहताच जमलेली कामगारांची गर्दी पांगली, आणि आपापल्या कामाला लागले. साईट इंजिनिअर सोबत दोघेही चौथ्या मजल्यावर गेले. बाल्कनीचा एक भाग तुटून पडला होता, त्याच्या वाकलेल्या लोखंडी सळ्या बाहेर दिसत होत्या. विकी चौथ्या मजल्यावर इकडे-तिकडे फिरून पाहात होता आणि विश्वनाथ पडलेला भाग पहात उभे होते.

विश्वनाथ एकदम चमकले आणि लक्ष देऊन पुन्हा पाहू लागले. स्लॅबच्या सळ्यांना एक कापड अडकले होते आणि जमिनीवर पडलेल्या स्लॅबच्या ढिगाऱ्यावर कुणीतरी रक्तबंबाळ होऊन पडले होते. पाठमोरे. म्हणून विश्वनाथ धावतच जिना उतरू लागले. सोबत साईट इंजिनिअर देखील उतरू लागला.

जिना उतरत असतानाच इंजिनिअरचा फोन वाजला,

"- - - - -." त्याने बोलून फोन ठेवला. आणि, विश्वनाथ सरांना म्हणाला, "सर, दवाखान्यातून फोन होता. आपण ऍडमिट केलेला गवंडी आत्ताच दवाखान्यातून पळून गेला म्हणे. रघुवीरप्रसाद."

विश्वनाथने एकदम चमकून त्याच्याकडे पहिले, पण काही बोलले नाहीत. तुटून पडलेल्या त्या ढिगासमोर जाऊन थांबले.

सर्वजण खाली गेल्यामुळे चौथ्या मजल्यावर एकटेच थांबलेल्या विकीला भस्सकन दारूचा वास आला. विकीने मागे वळून

पाहिले;

“हम यहां हूँ सरजी, आपके पीछे....”

मागून आवाज आला.

रघुवीरप्रसाद विकीकडे रोखून पहात,

त्याच्या मागेच थांबला होता...

'तुटून पडलेल्या त्या ढिगाकडे पाहिले तर त्याच्यावर कोणीच पडले नव्हते मग वरून असे का दिसले?'. असा विचार करत विश्वनाथांनी वर पाहिले तर सळ्यांना अडकलेले कापड देखील नव्हते.

"भैय्या, तो इथेच आहे, माझ्या मागे." म्हणून ओरडणाऱ्या विकीकडे लक्ष गेले तर त्या तुटलेल्या बाल्कनीजवळ विकी थांबला होता आणि पाठीमागे रघुवीरप्रसाद.

विकीला खाली धकलत होता...

विकीचा शर्ट त्या सळ्यांना अडकला आणि विकी त्या सिमेंटकाँक्रीटच्या ढिगावर येऊन जोरात पडला. रक्तबंबाळ होऊन पडला होता.

विश्वनाथना जसे वरून दिसले होते, तसाच पडला होता...

सुन्न झालेल्या विश्वनाथनी वरती पाहिले, चौथ्या मजल्याकडे. रघुवीरप्रसाद दिसतो का ते पाहू लागले. तर तो तिथे दिसलाच नाही.

"हम यहां हूँ सरजी, अब आपके पीछे...."

पाठीमागून आवाज आला. विश्वनाथ मागे वळून पाहतात तर रघुवीरप्रसाद डोक्यावरचा टॉवेल काढून कारच्या काचेवर पडलेली धूळ पुसत थांबला होता.

अंधुकसा दिसणारा! विश्वनाथकडेच रोखून पहात होता, रागाने!!!

*****

विकी जाऊन आज चौथा दिवस. घडलेल्या प्रसंगांनी हतबल झालेल्या विश्वनाथना पोलीस स्टेशनमधून सकाळीच फोन आला होता. विकीचा पोस्टमार्टम रिपोर्ट बाबत बोलण्यासाठी बोलावले होते. म्हणून निघाले, अर्थात एकटेच....

बारीक पाऊस पडत होता. कारचा वायपर चालू होता. कार सिग्नलला थांबली. कारमधल्या आरशातून मागे लक्ष गेले तर कोणीतरी कारची मागची काच पुसत होते. डाव्या हाताने आरसा सरळ करत निरखून पहिले. तर डोक्यावरचा टॉवेल काढून तो कारच्या मागच्या काचेवर पडलेले पाणी पुसत होता. तो म्हणजे रघुवीरप्रसाद,

अंधुकसा दिसणारा! विश्वनाथकडेच रोखून पहात होता, रागाने!!!

सिग्नल सुटताच घाबरलेले विश्वनाथ कार पळवू लागले. चालवता चालवता आरशातून मागे पाहू लागले. तो दिसत नव्हता, म्हणून त्याला इकडे-तिकडे शोधू लागले.

"हम यहां हूँ सरजी, आपके पीछे...." पाठीमागून आवाज आला. विश्वनाथ मागे वळून पाहतात तर रघुवीरप्रसाद मागेच बसला होता, त्यांच्या कारमध्येच मागच्या सीटवर बसला होता. त्यांच्याकडेच पाहात.

छातीत धडधडून पोटात उचंबळून आल्यासारखे वाटू लागले. हात थरथरू लागले, पाय लटपटू लागले. कार कुठेतरी, कोणालातरी ठोकणार असे वाटू लागले. कारवरचा ताबा सुटणार म्हणून त्यांनी ट्रॅफिकमधून कार रस्त्याच्या बाजूला घेतली. फूटपाथच्या बाजूला लावून कारमधून उतरून पळत सुटले, पोलीस स्टेशनकडे.

पोलीस स्टेशन मध्ये पळत येऊन विश्वनाथ काही वेळ बाहेरच थांबले आणि मनस्थिती सामान्य झाल्यावर आतमध्ये आले.

"वेलकम मिस्टर विश्वनाथ, बसून घ्या प्लिज, बी सीटेड." इंस्पेक्टरांचा आवाज ऐकताच भानावर आले आणि खुर्चीत बसले.

"विकींचा रिपोर्ट आलेला आहे, टुडे मॉर्निंग आय गॉट पीएम रिपोर्ट. रिपोर्ट प्रमाणे अपघाती मृत्यू झालाय त्यांचा. ऍक्सिडेंटल डेथ. पाय घसरून पडलेत ते. माफ करा पण दोन महिन्यातच आपले दोन्ही भाऊ..."

इंस्पेक्टरांचे बोलणे पूर्ण होण्याआधीच विश्वनाथ बोलू लागले," साहेब, आम्हाला मारण्याचा प्रयत्न होतोय. यातून वाचवा मला." झालेला प्रसंग विश्वनाथांनी पोलिसांना सांगितले. इंस्पेक्टरांनी हवालदार पाठवून विश्वनाथांची कार पोलीस स्टेशन मध्ये आणली.

"विकीचा मृत्यू अपघाती नव्हे, माझ्यामुळे झालाय. आता माझाही तसाच होणार, मला वाचवा प्लिज. सुरुवात माझ्यापासूनच झालीय." विश्वनाथ घाबरून रडू लागले आणि सांगू लागले.

समोरच्या खिडकीतून आपली कार उभी असलेली दिसली. डोक्यावरचा टॉवेल काढून तो कार पुसत होता, रघुवीरप्रसाद.

*****

"रघुवीरप्रसाद म्हणजे रघुवीरप्रसाद विश्वकर्मा, माझ्याकडे गवंडी म्हणून काम करायचा. गेल्या चार वर्षांपासून. उत्तर भारतीय, इकडे एकटाच राहायचा. साधारण विक्रांतच्याच उंचीचा आणि त्याच्या सारख्याच तब्बेतीचा. आमचा 'सप्तर्षी टॉवर्स' हा कमर्शियल प्रोजेक्ट म्हणावं तसा चालला नाही. त्यात आम्ही दोघे भाऊ कर्जबाजारी झालो. कर्जातून बाहेर पडण्यासाठी एका अनपेक्षित चमत्काराची गरज होती. विकीने एक आयडिया सांगितली. विकीला अपघातात मारायचे, आणि विकीच्या नावावर असणारी चार कोटी रुपयांची इन्शुरन्सची रक्कम उचलायची.
त्या दिवशी विकी मार्केटिंगसाठी बाहेरगावी जाणार होता. आमची जुनी कार घेऊन. जातेवेळी त्याला रघुवीरप्रसाद दारू पिऊन चाललेला दिसला. विकीने त्याला कारमध्ये बसवून घेतले आणि मला बोलावून घेतले. मी स्कुटरवरून त्याच्या मागे निघालो. तांबडी घाटात विकी थांबला, कारची काच धुक्याने दिसत नाही म्हणून पुसण्यासाठी म्हणून. एवढ्यात मी पोहोचलो. विकी एकटाच थांबला होता. म्हणून मी रघुवीरप्रसाद कुठे आहे विचारले. तर,

"हम यहां हूँ सरजी, आपके पीछे...." पाठीमागून आवाज आला. रघुवीरप्रसाद झाडामागे जाऊन परत आला आणि डोक्यावरचा टॉवेल काढून कारचे ग्लास पुसू लागला.

त्याचे लक्ष नसलेले पाहून विकीने एक जाड लाकूड त्याच्या डोक्यात घातले. रक्तबंबाळ झालेला रघुवीरप्रसाद खाली कोसळला आणि डोक्यातून पडलेले रक्त कारवर पडले. आम्ही त्याला कारमध्ये ड्रायविंग सीटवर बसवला, आणि कार पेटवून दिली. त्या झटापटीत विकीच्या डाव्या गालावर जखम झाली. कार पेटवून देण्याआधी कारला लागलेले रक्त त्याच्याच टॉवेलने पुसून काढले. आणि ती पेटलेली कार घाटातून दरीत ढकलून दिली."

"विक्रांत म्हणून गेलेला विकी दीड महिन्यांनी परत आला विक्रम म्हणून. विक्रांत मेला आणि विक्रम आला पण विकी विकीच होता. आमच्या दोघांशिवाय हा प्लॅन कोणालाच माहित नव्हता. पण त्याच्यामुळे हा सांगावा लागला."

समोर त्या कारजवळ थांबलेल्या रघुवीरप्रसादकडे बोट करून विश्वनाथ सांगत होते. पण तो इतर कोणालाच दिसत नव्हता.

*****

"मिस्टर विश्वनाथ, आपल्याला घटनास्थळावर जावे लागेल." एवढा वेळ ही कहाणी ऐकून मती गुंग झालेले इन्स्पेक्टर विश्वनाथना म्हणाले.

आपल्या कारमधून इन्स्पेक्टर आणि दोन हवालदार घेऊन विश्वनाथ तांबडी घाटाकडे निघाले. घटनास्थळी कार उभी करून घटना पुन्हा विस्तारून सांगितली.

इन्स्पेक्टर दरीकडे पहात होते. समोरचे दृश्य पाहून एकदम चमकून गेले. दरीत काही अंतरावर कोणीतरी पडलेले दिसले, रक्तबंबाळ झालेले. जवळच एक कार देखील होती.

"मिस्टर विश्वनाथ, प्लिज वेट; मी खाली जाऊन पाहून येतो." असे सांगून एका हवालदाराला सोबत घेऊन इन्स्पेक्टर पाय वाटेने त्या पडलेल्या व्यक्तीच्या दिशेने निघाले.

इन्स्पेक्टर दरीत जाऊन पहातात तर तिथे काहीच दिसत नाही. 'आपल्याला भास झाला कि काय?' म्हणत ते ती कार आणि पडलेल्या माणसाला इकडे-तिकडे शोधू लागतात.

सोबत थांबलेला हवालदार कुठे दिसत नाहीत आणि खाली गेलेले इन्स्पेक्टर साहेब पण दिसेनात म्हणून विश्वनाथ इकडे तिकडे शोधू लागले.

एवढ्यात,

"**हम यहां हूँ सरजी, आपके पीछे**...." पाठीमागून आवाज आला. विश्वनाथ मागे वळून पाहतात, तर रघुवीरप्रसाद डोक्यावरचा टॉवेल काढून कारच्या मागे काचेवर पडलेली धूळ पुसत थांबला होता. आणि पुसता पुसता कार ढकलू लागला, विश्वनाथच्याच दिशेने.

शोधणाऱ्या इन्स्पेक्टरांना जोरात किंचाळल्याचा आवाज आला म्हणून पाहतात तर, विश्वनाथला घेऊन ती कार खाली येत होती, दरीच्या दिशेने. विश्वनाथ रक्तबंबाळ होऊन खाली पडलेले आणि जवळच ती चेंदामेंदा झालेली कार, होंडासिटी.

इन्स्पेक्टरांना जसे वरून दिसले होते, आता तसेच पडले होते...

वर थांबलेले हवालदार पायवाटेने खाली पळत येत असता, इन्स्पेक्टर हात करून त्याला तेथेच थांबवत म्हणतात,

"फोन करून पंचनाम्याची टीम बोलवा
आणि बॉडी पोस्टमार्टमसाठी पाठवायची व्यवस्था करा!!"

*****

आणि तो,
“हम यहां हूँ सरजी, आपके पीछे....
अब पीछे नहीं, आपके साथमें....”

म्हणत रघुवीरप्रसाद डोक्यावरचा टॉवेल काढून कारला लागलेले रक्त पुसत थांबला होता.

अंधुकसा दिसणारा!
विश्वनाथकडेच रोखून पहात होता, रागाने,
हसत-हसत पहात होता!!!

(24/07/2020)

बुधवार : तारीख, बारा-ऑक्टोबर - - -!!!

संध्याकाळचे साडे-सहा वाजून गेले होते, दिवस संपून अंधार पडू लागला होता.

घरी जाण्यासाठी रेल्वे-कार्यशाळेच्या म्हणजे ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या आवारातून तो नेहमीप्रमाणे बाहेर पडला. कार्यशाळेचे गेट ओलांडून समोरून जाणाऱ्या मोठ्या रस्त्यावरून उजवीकडे आपली कार वळवली, आणि काही सेकंदातच वीस वरून सत्तर-ऐंशीच्या वेगाने कार पळवू लागला. त्या रस्त्याने सात-आठ किलोमीटर सरळ गेल्यानंतर; चौकातून डावीकडे जाणाऱ्या रस्त्याला तो वळायचा. आणि तिथून दोन-अडीच किलोमीटर गेल्यानंतर असणाऱ्या रेल्वे-कॉलनीमध्ये त्याचे स्वतःचे घर होते. रस्त्यावरच्या रहदारीमुळे रोज साधारण वीसेक मिनिटे लागतात त्याला घरी पोहोचायला.

आज रस्त्यावरची रहदारी थोडी कमी असल्यामुळे तो वेगात कार चालवत होता. त्याचा नेहमीचा वळायचा चौक आला, पण तो आज डावीकडे न-वळता त्याच वेगात सरळ निघून गेला. आपल्याच तंद्रीत तो कार चालवत होता. संध्याकाळचे रात्रीत रूपांतर झाले, पुढचे काहीच दिसत नसल्यामुळे त्याने गाडीचे लाईट्स लावले. रस्त्यावरची थोडीफार असणारी गर्दीपण कमी झाली गावची सीमा संपली; तरी तो चालला होता. रहदारी संपली, रस्ता पूर्णपणे निर्जन झाला, आणि रात्रपण काळीकुट्ट झाली. रस्त्याकडेला असणाऱ्या घरांच्या रांगा संपून शेती सुरू झाली आणि झाडांची घनता वाढू लागली. गावाबाहेर वीसेक किलोमीटर अंतरावर असणाऱ्या एका टेकडीवरून तो रस्ता पुढे उतरत दुसऱ्या शहराकडे जात होता.

त्याच वेगात तो, ती निर्जन टेकडी चढू लागला, आणि एकदम भानावर आला! समोरच रेल्वे क्रॉसिंग. रेल्वे क्रॉसिंग पहाताच; आपलं काहीतरी चुकल्याचे त्याच्या ध्यानात आले. त्याने कच्चकन ब्रेक दाबला आणि कार थांबवली. स्वतःवरच वैतागून, एकदा दोन्ही बाजूला आणि मागे-पुढे काही नसल्याचे पाहून परत घरी जाण्यासाठी कार वळवू लागला. रस्ता अरुंद असल्याने यु-टर्न बसत नव्हता म्हणून त्याने कार थोडीशी डावीकडे म्हणजे चार-पाच फूट रस्त्यावरून खाली घेतली. बॅक-गियर टाकून आरशात बघत जोरात मागे वळवून घेऊ लागला.

बॅक-लाईटच्या प्रकाशात मागून कोणीतरी त्याच्याकडेच रोखून बघत उभे असलेले आरशातून त्याला अचानक दिसले. ब्रेक दाबून कार

थांबवायचा त्याने प्रयत्न केला, पण ती व्यक्ती कारमागे अचानक इतकी जवळ थांबली होती कि; धा-डकन धडकून; बाजूला उडून रस्त्यापासून काही अंतरावर असणाऱ्या दगडावर जोरात आपटली. त्या धडकेने कारसहित तो सुद्धा हालला. त्या धक्क्याने डॅश-बोर्डवर चिकटवलेला कार-परफ्युम स्प्रे त्याच्या पायात पडला. आणि त्यामुळे कारमध्ये सुगंध दरवळला. तो इतका घाबरला की, धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके याच्या व्यतिरिक्त काहीच सुचत नव्हते!!!

काहीच सुचत नसल्यामुळे रस्त्यावरच कार थांबवून, स्टेरिंगवर डोके ठेवून तो कारमधेच बसून होता. कण्हण्याचा आवाज आल्याने तो भानावर आला. भानावर येताच पुन्हा मागे पाहिले; तर ती रक्तबंबाळ झालेली व्यक्ती रस्त्याकडेला पडली होती.

त्या कण्हणाऱ्याच्या नाका-तोंडातून आणि कानातून भळाभळा रक्त वहात होते. ज्या दगडावर तो जोरात आपटला होता तो दगड देखील रक्तबंबाळ झाल्याचे त्याला कार-लाईटच्या प्रकाशात दिसला. इतका वेळ रस्त्याच्या मध्ये असणारी आपली कार त्याने परतीच्या दिशेने बाजूला लावली, आणि बाहेर आला.

कारमधून उतरून; हातात टॉर्च घेऊन, अपघात झालेल्या दिशेने तो गेला. टॉर्चच्या प्रकाशात त्याने पाहिले तर तिथे कोणीच नव्हते! भयानक शांतता!

ना ती रक्त-बंबाळ झालेली व्यक्ती, ना तो कण्हण्याचा आवाज, ना ते दगडावरचे रक्त; काहीच नव्हते! जैसे-थे, जसे काही काहीच घडले नव्हते!!!

पुन्हा धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके.

लटपटणाऱ्या पायांनी तो कारजवळ आला, दरवाजा उघडला तर कार-परफ्युमचा सुगंध त्याला जाणवला. म्हणून टॉर्चच्या उजेडात, मघाशी पायात पडलेला कार-परफ्युम शोधू लागला तर तो सापडलाच नाही. सहज त्याचे लक्ष्य डॅश-बोर्डकडे गेले, तर परफ्युम-स्प्रे जसाच्या-तसा लावलेला होता. जैसे थे; जसे काही काहीच घडले नव्हते!

पटकन कारमध्ये बसला, धाडकन दरवाजा लावून घेतला, खिडक्यांचे काच लावून घेतले. घशाला कोरड पडली होती म्हणून बाजूला ठेवलेली प्लॅस्टिकची पाण्याची बाटली त्याने हातात घेतली. तर त्यात जेमतेम अर्धा-एक घोट पाणी. जे काही उरले-सुरले पाणी होते, ते पिऊन त्याने कोरडा झालेला घसा ओला करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. झाकण न-लावताच पाण्याची ती रिकामी बाटली आणि झाकण नकळत बाजूच्या सीटवर टाकली. अशा परिस्थितीत 'कार चालू होईल कि नाही', विचार करत तो किल्ली फिरवू लागताच; त्याच्या लक्षात आले कि कार चालूच आहे. आणि पार्किंग लाईट देखील

ब्लिंक करत आहेत. पार्किंग लाईट बंद आणि हेड-लाईट ऑन करून गियर टाकला आणि मागे न-बघताच घराच्या दिशेने कार पळवू लागला.

काही अंतर पुढे जाताच बाहेर डाव्या बाजूला काहीतरी हलल्यासारखे जाणवले म्हणून त्याचे लक्ष बाहेर गेले. बघतो तर ती व्यक्ती त्याच्या कारच्या अगदी जवळूनच, डाव्या बाजूने, त्याच्या सोबत पळत होती. कण्हत, त्याच्याकडेच पहात, रक्त-बंबाळ झालेली.

घाबरून; चाळीस-पन्नास-सत्तर-ऐंशी-शंभर-एकशेवीस असा वेग वाढवत तो कार पळवत चालला होता. ती आकृतीसुद्धा तशीच वेग वाढवत पळत होती; त्याच्याशी स्पर्धा करत. त्याच्याकडे एकटक रोखून बघत!!!

तो फक्त समोर पहात चालवत होता. काहीवेळातच गावातले दिवे दिसू लागले, इमारतींच्या रांगा दिसू लागल्या. रस्त्यावरची रहदारी पूर्णपणे कमी झाली होती. त्याचे लक्ष पुन्हा डावीकडे गेले, त्या पळणाऱ्या व्यक्तीकडे; तर ती गायब,

म्हणजे ती आणि तिचे कण्हणे काहीच नव्हते! म्हणजे भासच होता तर.....

बघता-बघता चौक आला, घरी जाण्याचा, आता उजवीकडे वळण्याचा. पण तो तिथून सरळच निघून गेला, वेगात. जेंव्हा भानावर आला तेंव्हा स्वतःच्या ऑफिसच्या म्हणजे ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या समोर आला होता. इन्स्टिट्यूटच्या गेटसमोर, काही अंतरावर त्याने आपली कार रस्त्याच्या बाजूला थांबवली आणि सीटवर मागे रेलून शांतपणे डोळे मिटून तो बसून राहिला. कितीवेळ ? त्यालाच माहित नव्हते.

*****

तो म्हणजे तरूणकुमार झा. वय-वर्षे बेचाळीस, शिक्षण- मॅकेनिकल इंजिनिअर. सध्या पत्नी, दोन मुली, आई-वडिलांच्यासोबत रहात होता. रेल्वे कर्मचाऱ्यांनी बनवलेल्या कॉलनीत त्यानेसुद्धा स्वतःचा प्लॉट घेऊन, नुकताच एक तीन बेडरूम-एक गेस्टरूम असलेला दोनमजली बंगला बांधला होता. पत्नी जवळच्याच एका स्थानिक-बँकेत नोकरी करत होती. दोन्ही मुली एका नामांकित शाळेत, स्कूल-बसने जात होत्या. बिहारमधल्या आपल्या मूळ गावात पेशाने शिक्षक असणारे पण सध्या सेवानिवृत्त झालेले त्याचे बाबूजी म्हणजे वडील इथेच रहायचे, महिन्या-दोन महिन्यातून एखादा आठवडा आपल्या गावी जाऊन यायचे. आणि त्याची माँ म्हणजे आई घरचे व्यवस्थापन पहायची.

तरूणकुमार आपले शिक्षण पूर्ण होताच खाजगी कंपनीमध्ये नोकरीला लागला. नोकरी करता-करता वेगवेगळ्या सरकारी परीक्षा देत होता. त्यातूनच रेल्वेच्या एका परीक्षेत तो पास होऊन, लोको-पायलट म्हणजे इंजिनमन पदासाठी त्याची निवड झाली. आणि तो रेल्वेची नोकरी करू लागला. बारा-तेरा वर्षातच त्याची प्रगती, कामातली चिकाटी आणि असणाऱ्या ओळखीमुळे त्याला बरीच बढती मिळाली. आणि आज तो रेल्वे ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या लोको-पायलट ट्रेनिंग-डिपार्टमेंटचा हेड म्हणून, इथे गेल्या तीन-चार वर्षांपासून काम करत होता. त्याच्या मनमिळावू स्वभावामुळे ट्रेनिंसहित आपल्या सर्व स्टाफसोबत तो सर्वांशीच हसून-खेळून वागायचा. त्यामुळे त्याच्याविषयी सगळ्यांना आदर वाटायचा.

*****

डाव्या-बाजूच्या खिडकीच्या काचेवर कुणीतरी ठक-ठक आवाज करताच तरुणकुमारला जाग आली.

घाबरून पहातो तर त्याच्या ऑफिसच्या गेटवरचा वाचमन, उजव्या हाताचे अंगठ्याजवळचे बोट त्या काचेवर हळूच आवाज करत त्याच्याकडेच पहात,

"सरजी, उठिये सरजी! आप ठीक तो हो?

कोई तकलीफ है क्या?" म्हणत थांबला होता.

दोन्ही हातानी डोळे चोळत, किल-किले डोळे करून तरुणकुमार इकडे-तिकडे पाहू लागला. आपले डोळे गरम होऊन पापण्या भाजत असल्याची त्याला जाणीव झाली. एवढ्यात बाजूने तरुणची पत्नी आली आणि बाहेरूनच दरवाजा उघडला. कारचे दरवाजे आतून लॉकच केले नसल्याचे त्याच्या लक्षात आले, तेंव्हा आवंढा गिळून, खोलवर श्वास घेतला.

"अजी, कहाँ थे आप इतनी देर तक? चौकीदारभैय्या म्हणाले तुम्ही साडेसहा-पावणेसात वाजताच घरी गेलात म्हणून?" ती हिंदीत त्याला विचारत होती.

पण तो काहीच बोलत नव्हता.

"आपको तो बहुत तेज बुखार है." त्याच्या कपाळावर हात ठेवत ती म्हणाली.

तिच्यासोबत आलेल्या त्याच्या वडिलांनी पण त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण तो काहीच उत्तर देत नव्हता.

सात-सव्वासात वाजेपर्यंत घरी येणारा तरुण अजूनही आला नाही म्हणून आठ वाजल्या पासून ते त्याला फोन लावत होते तर हा उचलतच नव्हता. गेटवर फोन केलातर तो वेळेतच घरी निघाल्याचे कळले. म्हणून त्याची पत्नी आणि बाबूजी स्कुटीवरून ऑफिसात आले होते. गेले दोन-तीन तास ऑफिसात बसून त्याची वाट पाहिली तरी त्याचा ठाव-ठिकाणा लागत नव्हता. शेवटी बराचवेळ गेटसमोर कुणाची तरी कार थांबलेली वाचमनने पाहिली. जवळ जाताच तरुण-सरजींची कार ओळखून त्याने ऑफिसमध्ये वाट बघत बसलेल्या तिला आणि बाबूजींना सांगितले.

सोबतची स्कुटी त्यांनी ऑफिसच्या समोर लावली, तरुणला मागच्या सीटवर झोपवले, आणि त्याची पत्नी कार चालवत घरी निघाली. तिच्या शेजारच्या सीटवर बसलेले बाबूजी मागे वळून त्याला हिंदीत म्हणाले, "आम्ही बरेच कॉल केले तरी तू फोन घेत नव्हतास म्हणून आम्हाला भीती वाटली. दोन तास वाट पहात बसलो होतो इथे." त्याने झोपल्या-झोपल्या हळूच आपला मोबाईल-फोन पाहिला तर पत्नीचे, बाबूजींचे, ऑफिसचे, मित्रांचे असे सर्वांचे मिळून अठ्ठावीस ते तीस मिस्ड-कॉल्स! तो फोन पहात असतानाच त्याची पत्नी म्हणाली, "और समय देखा आपने, साडे-ग्यारह बज चुके हैं, और आधे-घंटेमे आजकी तारीख भी खत्म हो जायेगी."

त्याने वेळ पाहिली खरोखरच साडे-अकरा वाजले होते. आणि आजची तारीख पाहून मन चर्रर्रर्र झाले, आजची तारीख; बारा-ऑक्टोबर- दोनहजार सोळा आणि वार सुद्धा - बुधवार!

पुन्हा छातीत धड-धड, अंगात थर-थर आणि डोके सुंद!!!

*****

तारीख: बारा-ऑक्टोबर-दोनहजारपाच, वार-बुधवार, अकरा वर्षांपूर्वी; याच दिवशी तो असिस्टंट-इंजिनमन म्हणून पहिल्यांदाच ट्रेन चालवायला निघाला.

ट्रेनिंग पूर्ण होताच, डोंगराळ भागाच्या पायथ्याशी असणाऱ्या शेवटच्या मोट्ठ्या स्टेशन मध्ये तो असिस्टंट इंजिनमन म्हणून आला. सकाळी नऊ वाजता इथून निघणारी संपर्क-क्रांती दुपारी तीन वाजता दिल्लीला पोहोचायची आणि लगेचच म्हणजे दुपारी चार वाजता दिल्लीहून निघून ती रात्री परत यायची. अशा या रोज दिल्लीला जाऊन-येणाऱ्या संपर्क-क्रांती ट्रेनचा असिस्टंट लोको-पायलट म्हणजेच इंजिनमन म्हणून तो चालला होता.

सकाळी लवकर उठून आवरले, एका मंदिरात जाऊन आला, आजची तारीख आणि वार आपल्या डायरीत लिहून ठेवली

"तारीख: बारा-ऑक्टोबर-दोनहजारपाच वार: बुधवार,

मी आयुष्यात पहिल्यांदाच पॅसेंजर ट्रेनचा लोको पायलट म्हणून जाणार." आणि ठरलेल्या वेळेप्रमाणे आठ वाजता आपल्या कामावर पोहोचला. सोबत दोन सिनिअर. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तो निघाला. साडे-आठ वाजता त्याच्या सिनिअरनी ट्रेन प्लॅटफॉर्मवर लावली, तो सारे काही फक्त पहात होता. नऊ वाजता ट्रेन निघाली, काही अंतर जाताच चालवण्यातले बारकावे सांगून सिनिअरनी इंजिनचा ताबा त्याच्या हातात दिला. ट्रैनिंगच्या वेळी आणि गुड्स ट्रेनवर व्यवस्थित शिकलेला तरुण एका अनुभवी इंजिनमन प्रमाणे ट्रेन पळवत दिल्लीत पोहोचला.

ठरल्याप्रमाणे चार वाजता परतीचा प्रवास सुरु झाला. ट्रेनमध्ये बरीच गर्दी होती. आजच्या पहिल्याच प्रवासात अर्ध्यापेक्षा जास्त वेळ त्याचाच ताबा इंजिनवर होता. सोबतच्या दोन्ही सिनिअर्सना त्याच्या पहिल्याच दिवसाच्या प्रगतीचे कौतुक वाटत होते. दिल्लीपासून निघाल्यानंतर तीनशे किलोमीटरपैकी शेवटचा शंभरेक किलोमीटरचा भाग जंगलातून जात होता, तांडा नावाच्या जंगलातून. शेवटची सत्तरेक किलोमीटरचे अंतर राहिले होते, अर्थातच तरुणच ट्रेन चालवत होता.

दोन्ही बाजूला असणाऱ्या घनदाट तांडा जंगलातून ट्रेन चालली होती, रात्र झाल्यामुळे लाईट्स लावले होते. लाईटच्या प्रकाशात रुळावरचे सोडून आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते. तरुण पूर्णपणे तल्लीन होऊन चालवत होता, एवढ्यात लाईटच्या प्रकाशात लांबवर ट्रॅकवर कोणीतरी माणूस उभे असल्याचे त्याला दिसले. त्याने बराचवेळ ट्रेनची शिटी वाजवली पण तो मनुष्य हलतच नव्हता. त्याच्या मागे उभे असलेले त्याचे सिनिअर पूर्णपणे लक्ष देऊन होते.

तरुण आता काय करणार हे त्यांच्या लक्षात आले, आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे तरुणने वेगात चाललेल्या ट्रेनचा वेग कमी करत ब्रेक-लिव्हरकडे हात नेला. त्याचा हात ब्रेककडे जाताच सिनिअरने त्याचा हात घट्ट धरला आणि ट्रेनला त्याच वेगात जाऊ दिले.

धाड-धाड करत चाललेल्या इंजिन समोरून एक किंकाळी आणि 'खट्ट' असा आवाज आला, ट्रेन तशीच पळत राहिली आणि तरुणने घट्ट डोळे मिटले. तरुणला बाजूला बसवून त्याच्या एका सिनिअरने इंजिनचा ताबा घेतला. दुसरे सिनिअर त्याच्या बाजूला थांबले.

धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके; याच्या व्यतिरिक्त तरुणला काहीच सुचत नव्हते!!!

शेवटचे स्टेशन आले तरी तरुण अजून सावरला नव्हता. ट्रेन प्लॅटफॉर्मवरून डॉकयार्डला लावून दोघांनी त्याला खाली उतरवला, उतरताच तो इंजिनसमोर गेला आणि इकडे तिकडे पाहू लागला. पहिल्याच ड्राइव्हिंग मध्ये माझ्याकडून एक उडवला गेला...

"देखो बेटे, रास्तेमे ऐसे जो भी हादसे होते है, उसे ये रानी उधरही भूल जाती है। वैसेही हमें भी ऐसे हादसे भूलना होता है। क्योंकी ना तो हमारी भूल है या ना इसकी." असे एक सिनिअर इंजिनकडे पहात त्याला म्हणाला.

खरंच घडलेल्या प्रसंगाचे काहीच अस्तित्व आपल्याकडे न-ठेवता ते इंजिन शांतपणे उभे होते, उद्या पुन्हा त्याच रस्त्यावरून जाण्यासाठी.

आयुष्यात पहिल्यांदाच आपण एवढी कामगिरी केली याचा आनंद मानावा की झालेल्या घटनेचे दु:ख मानावे? रात्रभर व्यवस्थित झोप न-झाल्याने तरुण उशिराच उठला. आज दुसरी टीम ट्रेन घेऊन जाणार असल्याने त्याची ट्रेनवर ड्युटी नव्हती, म्हणून तो आपल्या त्या दोन सिनिअर सोबत डॉकवरच होता. तेथे ठेवलेला पेपर चाळत बसला होता, एवढ्यात त्याचे लक्ष एका बातमीकडे गेले,

'तांडा जंगलात संपर्कक्रांतीखाली - - - - रात्री एका तरुणाची आत्महत्त्या - - - -'

आणि तो सुंन्न झाला.

त्याचा मूड आणि तो वाचत असलेली बातमी पाहून त्यातला एक सिनिअर हिंदीमध्ये त्याच्याशी बोलू लागला, "मला माहित होते, तू काल

ब्रेक लावत होतास पण त्याचवेळी मी तुझा हात धरला, कारण आपण एकाला वाचवायला गेलो असतोतर, आपल्या सोबत असणाऱ्या मागच्या प्रवाशांचे काय झाले असते? याचा विचार केला नाहीस त्यावेळी तू. आपलं कामच असं असतं. आपल्या रस्त्यावर येणारा त्याच्या नशिबानेच समोर येतो आणि जातो सुद्धा नशिबानेच."

तिसऱ्या दिवशी पुन्हा संपर्कक्रांती घेऊन आपल्या सिनिअर सोबत निघाला. काही दिवस तांडा जंगल संपल्यानंतरच त्याचे सिनिअर त्याला इंजिनचा ताबा द्यायचे. बघता-बघता एक वर्ष पूर्ण होत आले, त्याच्या हुशारीमुळे तो एकटाच व्यवस्थित इंजिन हॅण्डल करू लागला. सोबत सिनिअर असायचेच.

त्यादिवशी दिल्लीहून तो ट्रेन घेऊन परत येत होता. तांडा जंगल, त्याच ठिकाणी ट्रेन आल्याचे त्याला लक्षात आले, समोर ट्रॅकवर कोणीतरी उभे असलेले दिसले. त्याने शिटी वाजवली. यावेळी त्याचे सिनिअर त्याच्याजवळ आलेच नाहीत. धाड-धाड चाललेली ट्रेन, पुन्हा किंकाळी आणि पुन्हा 'खट्ट' असा आवाज. समोरचा तो प्रसंग बघू न-शकल्यामुळे; त्याने डाव्या बाजूला मान वळवली, आणि एकदम धस्स झाले कारण रक्त-बंबाळ झालेली एक व्यक्ती त्याच्याकडेच पहात ट्रेन सोबतच पळत होती, किंचाळत; त्याच वेगात!

ट्रेन प्लॅटफॉर्मवरून डॉकयार्डला लावली, तिघेही उतरले. तरुण उतरताच पटकन इंजिनसमोर गेला आणि इकडे तिकडे पाहू लागला

तर त्याचा एक सिनिअर हसत-हसत त्याच्याकडे आणि इंजिनकडे पहात त्याची गंमत करत म्हणाला, "असा काय बघतोस इंजिनकडे? आज कुठे कुणाला उडवलंय हिने? हिने म्हणजे तुम्ही दोघांनी मिळून?"

त्या ठिकाणी आज पुन्हा घडलेली घटना तरुणने त्यांना सांगितली, तर ते हसू लागले आणि, "अरे तसे काही झाले असते तर आम्ही तुझ्याजवळ आलो नसतो का त्यावेळी? आमचंही लक्ष होतंच की समोर"

म्हणजे आज जे घडले, ते घडलेच नव्हते? म्हणजे खरे नव्हते, मग भास होता ???

काहीच न-बोलता तरुण घरी गेला, कॅलेंडर आणि डायरी पाहिली तर तीच तारीख होती,

तारीख : बारा-ऑक्टोबर!

अर्थातच; धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके याच्या व्यतिरिक्त काहीच सुचत नव्हते!!!

तीन-चार वर्षे निघून गेली, त्याचे लग्न झाले, तो एकटाच इथे रहात होता. त्याची पत्नी त्याच्या माँ-बाबुजीं सोबत त्याच्या मूळ गावीच रहात होती. तो एक सिनिअर इंजिनमन होऊन ट्रेन चालवू लागला, पण त्याच मार्गावर. त्या तीन-चार वर्षात त्याच्यासमोर आत्महत्त्येचे असे बरेच प्रसंग घडले, त्यातून तो एकदम निडर झाला. पण, बारा-ऑक्टोबरचा दिवस त्याच्या आयुष्यातून जात नव्हता. प्रत्येक वर्षी; बारा-ओक्टोबरच्या रात्री, त्याच ठिकाणी, धाड-धाड चाललेल्या ट्रेनसमोर, तो माणूस, ती शिटी, ती किंकाळी, तो 'खट्ट' असा आवाज, ती पाळणारी आकृती.

मग पुन्हा धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके!

जणू तो कॅलेंडरवर-त्या डायरीवर लक्ष ठेवून असायचा, त्या तारखेवर बारा-ऑक्टोबर!!!

काही वर्षानंतर, एक दिवस रात्री झोपताना त्याचे लक्ष सहज कॅलेण्डरकडे गेले, तर उद्या, तारीख: बारा-ऑक्टोबर आणि तो सुद्धा वार : बुधवार.

त्याला रात्रभर झोपच लागली नाही. सकाळी ड्युटीवर जायला निघाला तर उठताच आले नाही, बघतो तर तापाने फणफणलेला. त्याच्या आजारामुळे संपर्कक्रांतीसोबत त्याच्या ऐवजी दुसरे कोणीतरी गेले. दिवसभर प्रचंड तापाने तो नुसता बडबडत झोपला होता म्हणून त्याला दवाखान्यात ऍडमिट केले. आठ-दहा दिवसांनी तो बरा झाला, आणि बरा होताच नोकरी सोडण्याचा विचार करू लागला.

प्रत्येक वर्षी, तारीख बारा-ऑक्टोबर, ती किंकाळी, तो आवाज, ती आकृती. त्यानंतर होणारी त्याची मानसिक परिस्थिती आणि घ्यावी लागणारी आठ-दहा दिवसांची सुट्टी; या सगळ्या गोष्टींचा त्याला कंटाळा आला होता. आणि म्हणूनच त्याने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. त्याच्या सोबत काम करणारे आणि त्याचे वरिष्ठ त्याला नोकरी न-सोडण्यासाठी बरेच समजावून सांगत होते पण तो ऐकायलाच तयार नव्हता.

त्याच्यासोबत काम करणाऱ्यांनी त्याचा निर्णय त्याच्या घरच्यांना कळवले. त्याचा मनमिळावू स्वभाव आणि कामातली प्रगती पाहून त्याच्या वरिष्ठांनी त्याला दुसऱ्या ठिकाणी बदलीसाठी शिफारस केली. या सगळ्यांचे प्रयत्न आणि बाबूजींच्या असलेल्या ओळखीमुळे तो इथे कार्यशाळेत इंजिन-ट्रेनर म्हणून आला आणि प्रत्येक वर्षीचा बारा-ऑक्टोबर विसरून गेला. काही दिवसातच ट्रेनिंग-डिपार्टमेंट-हेड म्हणून काम पाहू लागला. बाबूजी सेवा-निवृत्त होताच सगळे मिळून इथेच राहू लागले.

******

जस-जसा ताप उतरू लागला तसा कपाळावर ठेवलेल्या पट्ट्यांचा थंडपणा त्याला जाणवू लागला. आजूबाजूला होणारा आवाज ऐकू येऊ लागला. बंद असलेल्या डोळ्यासमोर वर-खाली होणाऱ्या त्रिकोणी-चौकोनी-गोल-वलयाकार-पोकळ आकृत्या नजरेसमोरून नाहीशा होऊ लागल्या. म्हणजेच शुद्धीवर येऊन त्याने हळू-हळू डोळे उघडले. पाच-सहा वेळा हलकेच ओठांची उघडझाप करत तो सगळीकडे नजर फिरवू लागला, तर पत्नी कपाळावर पट्ट्या ठेवत त्याच्या शेजारी बसली होती. जवळच खुर्चीवर माँ बसली होती, दोन्ही मुली त्याच्याकडेच पहात माँला बिलगून थांबल्या होत्या. आणि सोफ्यावर बाबूजी बसले होते.

सगळीकडे नजर फिरवताच, आपण आपल्याच घरी असल्याचे त्याच्या लक्षात आले. दोन्ही मुलींकडे बघून एकदा मंदपणे हसला, हसताच रात्रभर शांतपणे त्याच्या शेजारीच उभ्या असलेल्या मुलींचा कोलाहल सुरु झाला. माँ-बाबूजी आणि पत्नी पण एकमेकांशी बोलू लागले.

सकाळचे आठ वाजले होते, मुली आवरुन शाळेला गेल्या. तरुण पण उठला, आवरुन तयार झाला, आणि पत्नीसोबत डॉक्टरकडे गेला. रात्री घडलेला सारा प्रसंग त्याने डॉक्टरांना सांगितला तेंव्हा डॉक्टरांनी तपासून औषधे दिली, आणि ताबडतोब मानसोपचार-तज्ज्ञांना भेटण्याचा सल्ला दिला. रात्री त्याच्यावर बेतलेला भयंकर प्रसंग ऐकून त्याची पत्नी घाबरून गेली. घरी माँ-बाबूजींना तिने सारे काही सांगितले. कोणत्यातरी बुवा-बाबाकडे दाखवावे असे माँचे म्हणणे होते, पण त्याला असल्या गोष्टीवर विश्वास नव्हता.

संध्याकाळचे सहा-साडेसहा वाजले होते, आपल्या पत्नीसोबत मानसोपचार-तज्ञांसमोर तो बसला होता. स्वतःहून, घडलेले सगळे प्रसंग

विस्तृतपणे सांगत होता. काही वर्षांपूर्वी बुधवारी, बारा-ऑक्टोबर दिवशी तांडा-जंगलात घडलेला तो पहिला प्रसंग, त्यानंतर प्रत्येक वर्षी होणारा भास, त्यानंतर पाच वर्षांपूर्वी 'बुधवारी' आलेल्या बारा-ऑक्टोबरला झालेला प्रचंड त्रास, हे सगळे प्रसंग त्याने सांगितले. पण इथे आल्यानंतर काहीच त्रास झाला नसल्याचे त्याने आवर्जून सांगितले. तज्ज्ञ त्याला बरेच प्रश्न विचारत होते आणि तो त्यांची उत्तरे व्यवस्थित देत होता.

म्हणजे गेली काही वर्षे तो हा प्रसंग विसरला होता. पण त्याला आठवणीत नसतानासुद्धा, काल पुन्हा असे का घडले? हे कळत नव्हते.

हे सगळे प्रसंग त्याने आजपर्यंत घरी कोणालाच सांगितले नव्हते. पण आता ऐकताच त्याच्या पत्नीच्या छातीत धडधड, अंगात थरथर येऊन, डोके सुंद झाले.

बराच वेळ विचार करत बसलेल्या तज्ज्ञांकडे टक लावून पहात ती अचानक ती बोलून गेली,

"मैने याद दिलाई थी इनको। मी आठवण करून दिली यांना!"

ती हिंदीत बोलू लागली, "काही दिवसापूर्वी यांची एक जुनी डायरी मला मिळाली. त्यात त्या बुधवारी, बारा-ऑक्टोबरला पहिल्यांदा ट्रेन चालवत दिल्लीला जाणार असल्याचे यांनी लिहिले होते. आणि काही दिवसांनी बारा-ऑक्टोबर येणार होता आणि यावर्षी तो योगायोगाने बुधवार होता म्हणून मी आठवण ठेवली. काल हे ऑफिसला जाताना मी त्यांना त्याविषयी शुभेच्छा दिल्या होत्या. पण बाकीचे मला काहीच माहित नव्हते."

त्याच्यावर वेगवेगळ्या चाचण्या घेऊन डॉक्टरांनी त्याला आणखी बरेच प्रश्न विचारून घेतले, बरेच काही लिहून ठेवले. डॉक्टरांनी कुणाकडून तरी एक लिंबू मागवला.

"हे सारे काही तुमच्या मनाचे खेळ आहेत. ती घटना तुमच्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी घर करून बसलेली आहे. ती तुम्हाला विसरणे जरुरी आहे. इतर दिवशी तुम्हाला काही होत नाही पण त्या वार-तारखेला आठवण झाल्यामुळे हे असे घडले. म्हणजे हा सारा भास आहे"
असे म्हणत, हातात चाकू घेऊन लिंबू चिरू लागले. लिंबू-चाकू पाहून हा डॉक्टर आहे कि कोणी मांत्रिक-बुवा आहे अशी त्याला शंका आली.

त्या लिंबाचे सामान चार भाग करत डॉक्टर पुन्हा बोलू लागले, "तुम्हाला वाटेल, मी कुणी मांत्रिक आहे का? पण मी तुमच्यावर एक छोटासा एक्सपेरिमेंट करणार आहे."

असे म्हणत डॉक्टरांनी त्याला लिंबाची शास्त्रीय माहिती सांगितली, त्याचे गुणधर्म, उपयोग सगळे काही सांगितले. आणि त्याला घट्ट डोळे मिटण्यास सांगितले, आणि म्हणाले," जो पर्यंत मी तुम्हाला सांगत नाही तोवर तुम्ही अजिबात डोळे उघडायचे नाही. तुमच्या हातात मी एक लिंबाची फोड ठेवणार आहे, तुम्ही हात पुढे करा."

डॉक्टरांनी सांगितल्यानुसार त्याने हात पुढे करताच त्यांनी एक लिंबाची फोड ठेवली आणि ती त्याला तोंडात टाकून जोरात चावण्यास सांगितली. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार त्याने ती तोंडात टाकली आणि कचकन चावली, तर त्याच्या आंबट रसामुळे त्याला शहारे आले. एवढ्यात डॉक्टरांनी त्याला डोळे उघडण्यास सांगितले.

लिंबाच्या आंबटपणामुळे आणखी घट्ट मिटलेले डोळे त्याने उघडले. समोर पहातो तर लिंबाचे चारही फोड डॉक्टरांच्या समोर जसेच्या-तसे होते, आणि तोंडात काहीच नव्हते!

म्हणजे डॉक्टरांनी त्याला लिंबू खाण्यास दिलाच नव्हता. "तुमच्या मनावर लिंबाचे परिणाम बिंबल्यामुळे आणि त्याची चव माहित असल्यामुळे तुम्हाला न-खाता सुद्धा तो खाल्ल्याची जाणीव झाली. तशीच ही पूर्वी घडलेली घटना आहे, तुमच्या मनात खोलवर दडलेली तिला आठवू नका." असे सांगून डॉक्टरांनी काही औषधे दिली.

आणि पुढे ती तारीख आणि तोच वार कधी येणार, कुणीही याचा विचारच न-करण्याचा सल्ला त्याला आणि त्याच्या पत्नीला दिला.

"खरंच बुधवारी येणारा बारा-ऑक्टोबर कधी येणार याचा विचारच नाही केला तर, आपल्याला हा प्रसंगच आठवणार नाही आणि हे पुन्हा घडणारच नाही ना? त्यामुळे आपण ती तारीख-वार किती वर्षांनी येणार हे पाहायचेच नाही." असे तरुण आणि त्याच्या पत्नीने आपापसात ठरवले आणि समाधानाने घरी गेले.

डॉक्टरांचे म्हणणे घरी सर्वांना सांगितल्यावर त्यांच्या सर्वांच्याच मनावरचे ओझे हलके झाले आणि सगळेजण आनंदी झाले. काहीही झाले तरी तो वार-तारीख पाहायचीच नाही असे सर्वांनी ठरवले.

पण, म्हणतात ना, माणसाचे मन कुतूहलाने भरलेले असते. काहीवेळा आपल्याला कुठेतरी दुखत असते, आपल्याला माहीतही असते तरी आपण तिथे सारखे दाबून; अजून दुखते का? हे पहात असतो.

त्याप्रमाणेच; तरुणला न-सांगता, बारा-ऑक्टोबर बुधवारी कधी येणार हे आपण पहिले तर काय फरक पडणार आहे?

आपण थोडेच त्याला सांगणार आहोत? असा विचार करून त्याच्या पत्नीने, माँ-बाबूजींनी रात्री आपल्या मोबाइलमध्ये तो दिवस पहिला.

तारीख: बारा-ऑक्टोबर, वार: बुधवार

त्याच कुतूहलाने तरुणने सर्वांच्या नकळत आपला मोबाईलमधला कॅलेंडर ओपन केला अन चाळू लागला.....

तारीख: बारा-ऑक्टोबर; बरोब्बर सहा वर्षांनी म्हणजे दोनहजार-बावीसला बुधवारी येणार,

आणि मग, पुन्हा असेच काहीतरी होणार, भयंकर!

कदाचित याहीपेक्षा भयंकर, भयानक!

या जाणिवेने; सारे शांतपणे एकमेकांकडे पहात बसले,

कारण;

धडधडणारी छाती, थरथरणारे अंग आणि सुंद झालेले डोके यामुळे काहीच सुचत नव्हते!!!

(12/10/2016)

लिफाफा: एका अव्यक्त प्रेमाचा

"**सा**हेब, तुमचं पार्सल आलंय!" खिडकीतून किलकिले डोळे करून बघणाऱ्या मनिषकडे पहात तो कुरिअरवाला म्हणाला.

दुपारी मिळालेल्या वेळेत, शांतपणे झोपलेल्या मनिषला खरेतर त्या वाजलेल्या बेलचा आणि बेल वाजवणाऱ्या कुरिअरवल्याचा राग आला होता. पण आपलंच काहीतरी पार्सल आल्याचे पाहून त्याने डोळे चोळत दरवाजा उघडला. त्या कुरिअरवाल्याने दिलेला पेन घेऊन सांगितलेल्या ठिकाणी तो सही करू लागला, पण पेन उमटतच नव्हता. रागाने दोनतीन वेळा झटकून पाहिला पण उमटत नव्हता.

"काय रे, कसला रद्दड पेन वापरतोस?" असे वैतागून म्हणताच,

त्या कुरिअरवाल्याने;

"साहेब आत्ताच नवीन घेतलाय, चांगला लिहीत होता, हा घ्या."

असे म्हणत आपल्या खिशातला दुसरा पेन काढून त्याला दिला.

तो पण लिहीत नव्हता म्हणून त्याने आपल्या टेबलवर ठेवलेल्या पेन मधून एक पेन आणला आणि सही करू लागला.

नेहमी लिखाणासाठी वापरणारा त्याचा पेनदेखील लिहीत नव्हता

म्हणून तो पुन्हा वैतागला. "हा कागद आहे कि प्लास्टिक?

मी पेन्सिलने सही करतो, तूच पेनाने गिरव त्यावर."

असे म्हणत टेबलवरची पेन्सिल आणून सही केली, आणि कागद-पत्रांनी भरलेला जाडजूड लिफाफा त्याच्याकडून घेतला.

त्याने पेन्सिलने केलेल्या सहीवर तो कुरिअरवाला पेनने गिरवताच तो पेन लिहिला गेला. आणि, "बघा साहेब, माझा पेन चांगला आहे." असे तो म्हणताच, "ठीक आहे; जा आता, फार शहाणा आहेस!" असे म्हणत मनीषने रागाने दरवाजा बंद केला. दुपारी कुरिअरवाल्याने केलेली झोपमोड, त्यात ते न-लिहिलेले पेन, यामुळे वैतागलेल्या मनीषने तो लिफाफा, पेन-पेन्सिल टेबलवर ठेवले आणि पुन्हा रेस्ट-रुम मध्ये निघाला. जाता-जाता त्याचे लक्ष त्या पार्सलकडे गेले. त्यावर रोहित वाघमारे असे नाव होते, म्हणजे रोहित वाघमारे नावाच्या कुणाकडून तरी तो लिफाफा आला होता.

'रोहित वाघमारे, नाव कुठेतरी ऐकल्यासारखं वाटतंय!' असा विचार करत तो पुन्हा पलंगावर आडवा झाला. कितीतरी प्रकाशकांचे पार्सल, मेल-

फोन येत असतात, पण या नावाने आलेले पार्सल त्याने पहिल्यांदाच पाहिले होते. 'कोण असेल हा रोहित वाघमारे?' या विचारात त्याला झोपच लागत नव्हती.

बराच वेळ असाच विचार करत तो पलंगावर पडून होता. एवढ्यात बाहेरच्या खोलीतून म्हणजे त्याच्या ऑफिसमधून 'धप्पकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. आणि तो पटकन उठून गेला, बघतो तर ते रोहित वाघमारेचे पार्सल टेबलवरून खाली पडले होते, त्यावर ठेवलेले पेन आणि पेन्सिल देखील खाली पडले होते.

'काही वेळापूर्वी तो लिफाफा आणि पेन ठेवताना मी व्यवस्थित टेबलवर ठेवले होते, पण पडले कसे?" असा विचार करत त्याने ते पार्सल उचलले. त्याच्या सोबत पडलेले पेन जवळ-जवळ तुटूनच गेले होते. त्या पेनाच्या शाईचे शिंतोडे फरशीवर पसरले होते. पेन्सिलचे देखील शिस तुटले होते. तुटलेले पेन कचऱ्याच्या डब्यात टाकून, त्या पार्सलवर पडलेली शाई त्याने पुसून काढली, फरशी पुसून काढली. आणि हात धुण्यासाठी पुन्हा आतल्या रूम मध्ये गेला.

******

राहत्या घरापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर असणारी शांत आणि निर्जन वस्ती. आजूबाजूला भरपूर झाडी असल्यामुळे निसर्गरम्य होती. जेमतेम तीस-चाळीस घरे असतील तेथे. इथे शहराबाहेर, त्याच्या मनासारखा मिळालेला त्या वस्तीतला छोटासा; शेवटचा प्लॉट घेऊन त्याने

आपलं ऑफिस उघडलं होतं. तेथे त्याच्याशिवाय शक्यतो कुणीच येत नव्हते. आणि कुणीतरी तेथे आलेले त्याला आवडत देखील नव्हते.

गेट उघडून जाताच डावीकडे असणाऱ्या मोकळ्या जागेत त्याची कार होती. पुढे असणाऱ्या दहा-बारा फूट मोकळ्या जागेनंतर; दोन-तीन पायऱ्या चढून नेहमी बंद असणारा दरवाजा उघडताच पहिली खोली. ज्यात त्याचे ऑफिस होते. एक मोठ्ठा लाकडी टेबल, त्यावर त्याच आकाराची एक काच. आणि त्या काचेवर व्यवस्थितपणे ठेवलेली बरीच कागदपत्रे, लिखाणासाठी लागणारे साहित्य, पेन-पेन्सिल, चष्मा-लॅपटॉप, पाण्याचा जग-काचेचा ग्लास. त्यासमोर त्याला सोईस्कर वाटेल अशी त्याची साधी खुर्ची. बाजूच्या भिंतीला लागून एक मोठ्ठे लाकडी कपाट ज्यात नीट-नीटके मांडलेली, वेगवेगळ्या विषयाची बरीच पुस्तके ठेवली होती.

त्या खोलीतून आत जाताच विश्रांतीची खोली. त्याला लागूनच छोटेसे स्वयंपाक घर, त्यात त्याला स्वतःला लागेल तसे चहा-नाश्ता बनविण्याइतके साहित्य. बाजूला बाथरूम; असे एखाद्या समीक्षक किंवा अभ्यासकाला पुरेशी व्यवस्था असलेले ऑफिस आणि विश्रांतीगृह त्याने बनवले होते.

******

त्याच बाथरूमच्या वॉश-बेसिन मध्ये आपल्या हाताला लागलेली शाई त्याने म्हणजे मनीषने धुतली. बाजूला अडकवलेल्या टॉवेलला हात पुसत घड्याळाकडे पाहिले तर संध्याकाळचे पाच वाजले होते. चहा बनवून घेतला आणि ऑफिसमधल्या टेबलवर भरलेला कप ठेवून कामाला सुरुवात केली.

गरम-गरम चहा पित-पित रोहित वाघमारेचे ते पार्सल हातात घेऊन पाहू लागला.

ड्रॉवरमधली कात्री घेऊन लिफाफा उघडण्यासाठी कापू लागला. एवढ्यात तो बसलेल्या खुर्चीमागे त्याला कोणाची तरी हालचाल जाणवली; म्हणून मागे पाहिले, तर तेथे कोणीच नव्हते. आज दुपारी बराच वेळ झोपल्यामुळे भास असेल, असे समजून तो एकदा स्वतःशीच हसला आणि आपले काम करू लागला. थोडासा वाकून तो लिफाफा कापत असता त्याचे लक्ष टेबलवरच्या काचेत गेले आणि त्याच्या छातीत धस्स होऊन, अंगावर शहारे आले!!!

कारण, - - - - - -

कारण, त्याला टेबलवरच्या काचेतून हलणारे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसले;

त्याच्या पाठीमागून कोणीतरी दोघेजण त्या लिफाफ्याकडेच पहात असल्याचे प्रतिबिंब दिसले.

त्याच्या अगदी जवळून, मागून उजव्या बाजूला एक तरुण आणि डाव्या बाजूला एक तरुणी त्या पार्सलकडे पहात होते.

हा भास म्हणावा कि आणखी काही???

त्या तरुणीच्या मोकळ्या सोडलेल्या लांब केसांचा आणि त्या दोघांच्या गरम श्वासांचा स्पर्श त्याच्या कानाला आणि खांद्याला होताच त्याने पटकन मागे वळून पाहिले.

पण तेथे कोणीच नव्हते!!!

घाबरून, तो एकदा डावीकडे आणि पुन्हा उजवीकडे; झटकन मागे बघण्याच्या नादात त्याचा हात चहाच्या कपला लागला. तो कप खाली पडणार म्हणून तो सावरायला गेला, एवढ्यात ते पार्सल खाली पडले आणि त्यासोबत तो कप सुद्धा खाली पडून खळ्ळकन फुटला. त्यातला चहा त्या पार्सलवर आणि फरशीवर सांडला. त्याने फुटलेल्या कपचे तुकडे डस्ट-बिन मध्ये टाकले, पुन्हा फरशी आणि पार्सल साफ केले, वॉश-बेसिनमध्ये हात धुवून आला. काहीतरी वेगळेच घडतंय हे मानायला त्याचे मन तयारच नव्हते. दोन्ही हाताने डोके धरून स्वतःला सावरत खुर्चीवर बसला.

त्याची तंद्री भंग पावली तेंव्हा त्याच्या टेबलवरच्या फोनची घंटी 'किर्रर्र-किर्र्र्र' अशी वाजत होती. त्याने पटकन रिसिव्हर उचलून कानाला लावला.

"हॅलो, अहो कुठे आहेत तुम्ही? आज घरी येणार आहेत ना? कि काम आहे? कारण साडेसात वाजत आलेत म्हणून म्हटलं."- मनीषच्या पत्नीचा फोन होता.

फोनवर बोलता-बोलता त्याचे लक्ष त्या लिफाफ्याकडे गेले तर त्यातून एक कागद बाहेर आला होता, चहाने बराच भिजलेला. त्याने तो हळूच बाहेर ओढला तर तो कागद म्हणजे एक पत्र होते. रोहित वाघमारेने लिहिलेले पत्र. बोलता-बोलता त्याने डोळ्यावर चष्मा लावला.

"हो हो येतोच, थोडंसं काम आहे ते संपलं कि येतो. अंदाजे अर्धा-एक तास लागेल, मला वेळ लागला तर तुम्ही सगळे जेवून घ्या." ते पत्र चाळत मनीष आपल्या पत्नीला म्हणाला.

"यांचं काहीच खरं नसतं. कधी येतील, कधी पुन्हा ऑफिसला जातील काहीच नेम नाही. चार-पाच वर्षांपासून असेच सुरु आहे यांचं." असे पुटपुटत तिने फोन ठेवला.

खरंच, चार-पाच वर्षे झाली; मनीषच्या येण्या-जाण्याला काही वेळच नसायचा.

मनीष पार्थसारथी, जवळ जवळ पन्नाशीच्या जवळपासच्या वयोगटातला.

पेशाने प्रोफेसर, एका मोठ्या आणि नामांकित कॉलेजमध्ये विभाग-प्रमुख. पुस्तक-समीक्षा, लेख लिहिणे, विविध विषयांचे अभ्यास आणि त्यावर व्याख्याने देणे ही आवड पहिल्यापासून जपलेली. त्यात बऱ्याच प्रकाशकांची बरीच लिखाणे त्याच्याकडे समीक्षेसाठी, प्रूफ-रिडींग साठी यायची. घरी व्यवस्थित काम करता येत नसल्यामुळे घरापासून लांब स्वतःचे ऑफिस सुरु केले, स्वतःच्या मनासारखे.

प्रकाशकांचे काम, समीक्षण आणि व्याख्यान यात चांगलेच नाव झाल्यामुळे कामाचा बराच व्याप वाढला. त्यामुळे चार-पाच वर्षांपूर्वी आपली प्रोफेसरची नोकरी सोडून मनीषने पूर्णवेळ हेच काम सुरु केले.

'प्रिय मित्र मनीष, सप्रेम नमस्कार

मी रोहित वाघमारे ओळखलंस का? - - - - - - -'

चहा सांडून पुसट झालेले रोहितचे पत्र तो वाचू लागला.

पूर्ण वाचल्यानंतर त्याच्या लक्षात आले की हा रोहित वाघमारे आपल्याच सोबत कॉलेज मध्ये शिकणारा सायन्सचा विध्यार्थी. सिलॅबसची

पुस्तके सोडून इतर विषयाची पुस्तके कधीही न-वाचणारा. कुणीतरी बोललेल्या बोलण्यावर अर्धवट पोकळ चर्चा करणारा, आणि त्यामुळेच त्या बॅचमधला लक्षात राहिलेला सोबती, एवढीच काय ती ओळख. त्याने एक कथा पाठविली होती, त्याने स्वतः लिहिलीय असा त्याचा दावा आहे. आता हा लेखक कसा आणि कधीपासून झाला हा संशोधनाचाच विषय आहे.

पानभर लिहिलेला रोहित वाघमारेचा मजकूर वाचला.

'सोबत पाठविलेली कथा प्रकाशन-योग्य आहे कि नाही हे कळवणे.

तुझा कॉलेज-फ्रेंड

रोहित वाघमारे'

असे म्हणून त्याने आपला मोबाईल नंबर आणि पत्ता लिहिला होता.

'असो, एवढ्या विश्वासाने रोहितने आपलं लिखाण माझ्याकडे पाठवलंय म्हणजे लगेचच उत्तर द्यायला हवे', असा विचार करून त्याने तो लिफाफा हातात घेतला. त्यात प्लॅस्टिकच्या पेपरमध्ये लपेटलेला, लिखाणाच्या पेपरचा गठ्ठा तो बाहेर काढू लागला. एवढ्यात लाईट गेली, आज नेमका इन्व्हर्टरपण काम करत नव्हता. सर्वत्र भयाण अंधार पसरला. वैतागून त्याने ड्रॉवरमधून मेणबत्ती काढून लावली, आणि ती एकुलती एक मेणबत्ती त्या भयाण अंधाराला थोपवण्याचा केविलवाणा प्रयत्न करू लागली.

मिणमिणत्या मेणबत्तीच्या प्रकाशात फोनचा रिसिव्हर उचलला, आणि फोन लावला,

"हॅलो, अगं मी बोलतोय. काय झालं ना, घरी यायला निघालोच होतो, अचानक एक काम आलंय, ते संपवूनच घरी येतो. फारच वेळ लागला तर सकाळीच घरी येतो. तुम्ही जेवून घ्या सगळेजण." असे पत्नीला सांगत त्याने समोरचा लिफाफा नकळत हातात घेतला.

"हे नेहमीचंच झालंय, यात नवीन ते काय?" तिचे पुटपुटणे ऐकत त्याने फोन ठेवला.

फोन ठेवताच त्याच्या लक्षात आले कि लिफाफा चिकट झालाय, हातात घेताच हाताला काहीतरी चिकट लागले आहे. त्याने नकळत हात आपल्या नाकाजवळ नेला, तो चिकटपणा रक्ताचा असल्याचे वासावरून जाणवले आणि शिसारी आली. मेणबत्ती उचलून त्या प्रकाशात पाहिले टेबलवर त्या लिफाफ्याच्या आजू-बाजूला रक्त पसरले होते. झाला प्रकार भयानक असल्याने त्याच्या अंगावर शहारे आले. लटपटत्या पायाने तो वॉश-बेसिनकडे गेला, हँडवॉश लावून स्वच्छ हात धुतले. रक्ताळलेला हात धुतल्यामुळे पांढरा शुभ्र असणारा वॉशबेसिन लालसर झाल्याचे मेणबत्तीच्या प्रकाशात त्याला जाणवले. त्यामुळे घामाने डबडबलेला चेहरा धुण्याची इच्छा असूनसुद्धा त्याने धुतला नाही. कारण भयानकता वाढवणारे ते लाल रंगाचे पाणी. नॅपकिनने हात आणि घामेजलेला चेहरा पुसून, दोन्ही हाताने नॅपकिन चेहऱ्यावर दाबून तसाच शांतपणे आत पलंगावर बसून राहिला.

ऑफिसच्या खोलीत कुणाचीतरी कुजबुज जाणवली आणि तो पटकन उभा राहिला. त्या भयाण अंधारात त्याने मेणबत्ती कुठे ठेवली होती

आणि ती कधी विझली होती त्याला लक्षात येत नव्हते. तो शोधण्याचा प्रयत्न करत असतानाच लाईट आली आणि सगळीकडे लक्ख प्रकाश पडला. रक्ताने माखलेला टेबल साफ करण्यासाठी तो ऑफिसमध्ये आला. बघतो तर तेथे रक्त नव्हतेच!

ते तर डिंक होते; टेबलवरच्या बाटलीतून त्याचाच हात लागून सांडलेले डिंक!

त्याच्या जीवात जीव आला, त्याने ती डिंकाची बाटली डस्टबिन मध्ये फेकून दिली, आणि तो लिफाफा-टेबल साफ केले.

'आजचा दिवस साफ-सफाई करण्यातच जाणार बहुतेक!'

असा विचार करत घड्याळ पाहिले, तर साडे-नऊ वाजून गेले होते. किचनमध्ये जाऊन ब्रेड-जॅम खाऊन मस्तपैकी एक मग कॉफी बनवून प्याला आणि पुन्हा खुर्चीवर बसला.

पण राहून-राहून त्याला वाटत होतं कि आज माझ्याशिवाय कोणीतरी इथे वावरतंय!

नक्कीच काहीतरी घडतंय, अनाकलनीय असं! पण काय?

डोळ्यावर चष्मा लावला आणि तो लिफाफा हातात घेतला, त्यातून प्लास्टिक कागदात लपेटलेला तो पेपरचा गठ्ठा बाहेर काढला. प्लास्टिकचा पेपर कापण्यासाठी तो कात्री हातात घेणार एवढ्यात कुणीतरी त्याच्या हातावर जोरात प्रहार केला. कळवळून, लिफाफा धरलेल्या हाताने, लागलेल्या हातावर दाबत त्याने घट्ट डोळे मिटले. भानावर येताच इकडे-तिकडे पाहू लागला, पण कोणीच दिसत नव्हते.

टेबलवरच्या काचेत त्याचे लक्ष गेले तर पुन्हा प्रतिबिंब दिसले. हलणारे प्रतिबिंब! लांब मोकळे केस सोडलेल्या तरुणीचे प्रतिबिंब. त्याच्या टेबल समोरून त्याच्याकडेच हात करत उभी होती. समोर जमिनीवर त्याचे लक्ष गेले तर मोकळे केस सोडलेली सावली देखील लाईटच्या प्रकाशात दिसत होती, त्या प्रतिबिंबाप्रमाणेच त्याच्याकडे हात करत होती. म्हणजे ते प्रतिबिंब आणि सावली एकच होती, अदृश्य. ती सावली म्हणजे, ते प्रतिबिंब त्याच्याकडचा लिफाफा मागत होते, पण मनीषने तो लिफाफा घट्ट धरून ठेवला होता, नकळत!

घाबरून तो खुर्चीतून उठून उभा राहण्याचा प्रयत्न करत होता.

पाठीमागून त्याच्या खांद्यावर कोणीतरी दोन्ही हातानी दाबून, त्याला उठू देत नव्हते. त्याने काचेत पाहिले तर एक तरुण त्याला खांद्यावर दाबत असल्याचे प्रतिबिंब दिसले, आणि खुर्चीच्या मागे सावली सुद्धा दिसली.

मनीष एकदा समोर आणि एकदा पाठीमागे वारंवार पाहात होता.

मागून एक सावली त्याला वरून दाबत होती, समोरून एक सावली त्याला लिफाफा मागत होती आणि मनीष थरथरत, उठण्याचा प्रयत्न करत होता!

घामाने भिजलेला मनीष, स्वतःला वाचविण्यासाठी जिवाच्या आकांताने आरडा-ओरडा करत होता.

पण, त्या अदृश्य शक्तीसमोर ती मानवी शक्ती दुबळी पडली.

आणि हळूहळू त्या लिफाफ्यावरची त्याची पकड ढिली झाली!!!

****

तीन-चार वेळा रिंग झाल्यानंतर रोहितने वैतागून मोबाईल उचलला, तर पलीकडून आवाज आला, "हॅलो, मित्रा मी मनीष बोलतोय, मनीष पार्थसारथी! तुझे लिखाण वाचले. भयंकर झालंय, तू काहीही करून मला भेट. माझ्या ऑफिसमध्ये ये. लवकरात लवकर, शक्य झाले तर आत्ताच्या आत्ता, मला वाचव मित्रा, काहीही करून वाचव!!!"

आणि फोन कट झाला.

"ही लेखक मंडळी थोडी तंद्रीतच असतात, ही काय फोन करायची वेळ आहे?" असे म्हणत मोबाईल बाजूला ठेवत, रोहितने मोबाईल च्या घड्याळात पाहिले तर पहाटेचे पाच वाजले होते.

पण एकंदरीत काहीतरी गडबड असल्याचे त्याच्या लक्षात आले आणि तो आवरून ताबडतोब निघाला. मनीषकडे जायला!

*****

कितीही लवकर पोहोचावे म्हटले तरी, त्याला पोहोचायला सकाळचे आठ वाजलेच.

मनीषचे ऑफिस असलेल्या कॉलनीत तो पोहोचला. त्याच्या ऑफिसचा पत्ता विचारण्यासाठी त्याने कार रस्त्याच्या बाजूला लावली.

कॉलनीतले काही-लोक पेपर वाचत बसले होते, त्यांना रोहितने मनीषाचा पत्ता विचारताच,

त्यांनी "आपण?" असे विचारले.

"मी मित्र त्यांचा." असे म्हणताच, काहीही न-बोलता त्यातल्या एकाने तिकडे बोट दाखवले. निघता-निघता रोहितचे लक्ष त्यांच्या मागे असलेल्या, त्या कॉलनीच्या नोटीस-बोर्डकडे गेले; आणि,

“प्रसिद्ध समीक्षक आणि अभ्यासक, कॉलनीचे सदस्य
श्री मनीष पार्थसारथी यांचे रात्री बारा वाजता
हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन.
कॉलनिवासियांतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली”

हे वाचताच एकदम धस्स झाले, न-कळत त्या नोटीस-बोर्डकडे, त्या सगळ्यांकडे पहात थांबला.

एवढ्यात त्यातले एकटे म्हणाले, " मनीषसर सहसा कुणाशी बोलत नसत, पण काल रात्री अकरा-साडेअकरा वाजता अचानक ते ओरडू लागले. आम्ही जाऊन पाहतो तर असे घडले होते. कोणत्यातरी जबरदस्त मानसिक धक्क्यामुळे, खुर्चीवर बसल्या जागीच...."

तो जड पावलांनी चालत, त्या घराकडे निघाला, डोक्यात एकाच विचार घेऊन,

‘एक कळत नाही मनीष बारा वाजता गेला, पण पहाटे पाच वाजता फोन कुणी केला? ते सुद्धा मनीष म्हणून.’

विचारानेच पाय लटपटायला लागले, आणि छातीत धस्स झाले.

"मी म्हणालो होतो, ते लिखाण नष्ट कर म्हणून....

पण माझं ऐकलं नाहीस.”

कुणीतरी रोहितच्या कानात बोलल्यासारखे वाटले म्हणून तो तिथेच थबकला. आजू-बाजूला पहिले कोणीच नव्हते, पण आवाज ओळखीचा होता...

मधुसूदनचा आवाज? .....

त्याला तो दिवस आठवला, ज्या दिवशी त्याच्या मित्राचे म्हणजे मधुसूदनचे एक पत्र आलेले. ज्यात पत्रासोबत प्लास्टिकच्या कागदात लपेटलेला एक कागदाचा गठ्ठा होता.

"प्रिय मित्र रोहित,

आमच्या घरासमोर सागर नावाचा मुलगा राहायचा, त्याचे सरिता नावाच्या मुलीवर प्रेम होते. पण वडिलांच्या धाकामुळे तिने स्वतःला नदीत झोकन दिले. एक दिवस सागरला ती सरिता नदीजवळ अतृप्त आत्म्याच्या रूपाने भेटली होती. ती त्याला बोलवत होती, आपले प्रेम व्यक्त करत होती. सागर जिवंतपणी वेड्यासारखा त्या आत्म्याच्या मागे लागला होता.

कुणाशीच मनातले बोलला नव्हता. आणि एक दिवस सागरने स्वतःला तिच्या स्वाधीन केले.

काही दिवसांनी मला त्याची एक डायरी सापडली. त्यात सागर सरिताच्या अधुऱ्या प्रेमाची कहाणी उलगडली. सागर-सरिता माझ्या स्वप्नात येऊन ती डायरी नष्ट करण्यासाठी सांगत होते. पण मी ती डायरी वाचली, मी त्यावर एक कथा लिहिली. जी सागर-सरिताला आवडली नाही. म्हणून मला रोज रात्री ते भेटतात आणि प्रचंड छळ करतात अदृश्य रूपाने. त्यांची प्रेमकथा त्यांना अव्यक्त रहस्यच ठेवायची आहे. म्हणून ते लिखाण तुझ्याकडे पाठवतो आहे. तरी तू नष्ट कर, आणि त्यांना मुक्त कर. कुणालाही वाचू देऊ नकोस आणि तू सुद्धा वाचू नकोस. अनर्थ होईल."

ते पत्र मिळताच रोहित वाघमारे मधुसूदनला भेटायला गेला, पण तो संपला होता. कोणत्यातरी जबरदस्त मानसिक धक्क्यामुळे, खुर्चीवर बसल्या जागीच....

'त्याचे न-ऐकता, कुतूहलापोटी मी ते लिखाण मनीषला पाठवले आणि काय झाले???'

मनीषच्या ऑफिससमोर तुरळक गर्दी होती. गेटमधूनच त्याने मनातल्या मनात त्याची माफी मागितली आणि आत गेला. बरेच लोक त्याच्या अंत्यविधीला गेले होते म्हणून शांतपणे थांबून राहिला, पण त्याची नजर काहीतरी शोधत होती. आणि अचानक त्याला तो लिफाफा दिसला

टेबलच्या खाली पडलेला. सर्वांच्या न-कळत त्याने तो उचलला आणि निघाला. कारमध्ये बसून निघाला.

त्या लिफाफ्याचे काय करावे त्याला कळत नव्हते. तरी पण तो लिफाफा सोबत घेऊन आपल्याच तंद्रीत चालला होता. मागच्या सीटवर कसली तरी हालचाल जाणवताच तो एकदम भानावर आला. मागे वळून पहातो तर तेथे कोणीच दिसले नाही, पण कसली तरी कुजबुज अस्पष्टपणे जाणवत होती. शक्य तितक्या वेगाने तो कार पळवत चालला होता.

पण कुठे?

काहीच कळत नव्हते.

आपल्या मनाचा ताबा कुणीतरी घेतला आहे या तंद्रीत तो चालला होता.

नदीकाठी स्मशानात मनीषची चिता जळत होती. त्याला शेवटचा निरोप देऊन सर्वजण निघून गेले होते.

भयाण शांतता. फक्त त्या चीतेत जळताना, छाट-छुट असा होणारा आवाज.

नकळत तिथे आलेला रोहित वाघमारे, हात जोडून माफी मागितली. मनीषची, आणि त्या दोघांची सुद्धा.

शर्टच्या आतमध्ये लपवलेला तो लिफाफा त्याने बाहेर काढला. आणि सभोवताली आणि वर-खाली अश्रू भरलेल्या डोळ्यांनी पहात, मनीषच्या त्या जळणाऱ्या चितेत टाकला. त्याच्याकडे पाहात हात जोडून हुंदके देऊन रडू लागला.



त्या धगधगत्या आगीत तो लिफाफा फुर्र-फुर्र करत मनीषसोबत जळू लागला.

पुन्हा एकदा हात जोडून, डोळ्यातले अश्रू शर्टच्या बाह्यांना पुसत तो परत निघाला.

एवढ्यात,

एवढ्यात, त्याच्या शेजारून दोन टिटव्या;

टी-टीटीव - - - - टी-टीटीव - - - -

असा आवाज करत, त्या भयाण शांततेला चिरत, उडून गेल्या!!!

(29/11/2018)

ही वाट दूर जाते---!!!

या कथेविषयी काही शब्द:

खरे तर, ***"ही वाट दूर जाते"*** ही लघुकथा माझ्या **'काटा किर्रर्र'** या पहिल्या पुस्तकात प्रकाशित झालेली आहे.

याच कथेचा दुसरा भाग:

"लिफाफा: एका अव्यक्त प्रेमाचा!"

पहिल्या कथेचा संदर्भ यात आल्यामुळे सदर कथा पुन:प्रकाशित करत आहे.

ही वाट दूर जाते---!!!

संध्याकाळची वेळ, थंड वारा सुटलेला होता. त्या शांत वाऱ्याप्रमाणेच आज समुद्र पण शांत वाटत होता. त्याच्या लाटा संथपणे जमिनीकडे येत होत्या आणि परत जात होत्या. इतर वेळी घोंघावणाऱ्या वाऱ्या सोबत रौद्र लाटा देणारा तो अथांग सागर आज कंटाळून संथ झाल्यासारखा वाटत होता. जमिनीकडे येणाऱ्या प्रत्येक लाटेबरोबर काही शंख, शिंपले, छोटे छोटे मासे, खेकडे आणि इतर कीटक सुद्धा जमिनीवरयेत होते. त्यातले काही परतणाऱ्या लाटे सोबतच परत सागरात जात होते, तर काही जमिनीवर रहात होते. जमिनीवर राहिलेल्यांपैकी सुद्धा काही परत सागराकडे जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यांचे जीवनच सागराच्या पाण्यावर अवलंबून असल्या मुळे जगण्याच्या जिद्दीने त्यांचा प्रयत्न चालला होता. पण इतक्यात पुन्हा येणारी ती लाट त्यांना पाण्याबाहेर काढत होती. जगण्या साठीच्या त्या संघर्षात, त्या कीटकांच्या मानसिकतेत बरेच प्रकार जाणवत होते. कोणी परत जाण्यासाठी धडपडत होते, कोणी पुढची लाट आपल्याला परत घेवून जाईल या आशेवर होते. तर कोणी आपण परत पाण्यात जाऊच शकत नाही असा विचार करून निराश पणे त्या वाळूत पडून होते, त्या निर्जीव वाळूप्रमाणेच.

समुद्राकाठच्या एका छोट्याश्या खडकावर बसून मी हा सगळा प्रकार बघत होतो. आणि हा प्रकार आपल्या मानवी जीवनाला किती तंतोतंत लागू होतो याचाच विचार करत होतो. आमच्या घरा समोर राहणाऱ्या सागरचा विचार पटकन माझ्या नजरे समोर आला आणि गूढपणे शून्यात नजर लावून बसलेला त्याचा चेहरा माझ्या समोर दिसू लागला, जीवनाला कंटाळून निष्प्राण वाळूत पडलेल्या त्या निराश कीटकांसारखा. वीस-बावीस वर्षांचा तो सागर कोणाशीही काहीही बोलत नव्हता, काही बोलले तरी नुसती मान हलवून हो किंवा नाही एवढेच प्रतिसाद द्यायचा. मी जेंव्हा पासून त्याला बघतोय तेंव्हा पासून त्याची गूढ नजर आणि गूढ वागणे काही बदलत नव्हते. मी त्याला ओळखायला लागून एक-दोन महिने झाले असतील पण त्याला मी समजूच शकलो नव्हतो, मीच काय त्याला कोणीच समजू शकत नव्हते. त्याचे आई वडील देखील आपल्या एकुलत्या एका मुलाला समजू शकले नव्हते, कि हा असा का करतोय, याला काय झालंय आणि हा किती दिवस असेच करत राहणार.

*****

पाच सहा महिने झाले असतील त्या गोष्टीला. ऑफिसला सुट्टी असल्यामुळे दुपारी घरीच बसलो होतो. इतक्यात कुणीतरी दरवाजा वाजवला, म्हणून बघतो तर एक थकल्यासारखे वाटणारे गृहस्थ हातात एक कागद घेवून पत्ता विचारण्यासाठी उभे होते. त्या कागदावर आमच्या समोरच्याच रिकाम्या घराचा पत्ता लिहिला होता. मी त्यांना घर दाखवताच ते त्या घराकडे जावून त्या घराचे कुलूप काढू लागले. पाठोपाठ एक बाई आणि एक वीस-बावीस वर्षांचा मुलगा रिक्षातून उतरले आणि त्या घरात गेले. आई वडील आणि मुलगा असावेत असे वाटत होते. पाच सहा बॅगा

आणि काही समान त्या रिक्षातून उतरवून ते गृहस्थच आत नेवू लागले. मदतीसाठी विचारावे म्हणून पुढे गेलो, तर काही गरज नसल्याचे आणि "मदत लागल्यास बोलावतो, आता निघा तुम्ही'' असे विक्षिप्तपणे सांगितले. एवढा मोठा मुलगा असून सुद्धा असल्या तिरसट पणामुळे मदतीला येत नसावा असे मनात म्हणत, स्वत:वर चीड चीड करतच घरी आलो. आणि दरवाजा बंद करून खिडकीतून बघू लागलो. सर्व समान आत नेवून एकट्यानेच आत नेवून त्यांनी दरवाजा धाड करून बंद करून घेतला.

त्या दिवशी बंद केलेला दरवाजा त्यानंतर क्वचितच उघडला जात असे. साहजिकच आजूबाजूला राहणाऱ्यांना कुतूहलाचा विषय झाला. कोणी काही विचारायला गेले तर ते गृहस्थ दरवाजा न उघडताच खिडकीतूनच विचारून, मोघम उत्तर द्यायचे, आणि जास्त विचारपूस केली तर या घराच्या घर मालकांना विचारा असे सांगायचे. आजूबाजूच्या लोकांनी न राहवून घर मालकांना म्हणजे शास्त्री सरांना या विषयी विचारायचे ठरवले. सागर आणि त्याचे आई वडील सागरच्या उपचारासाठी काही महिन्यांसाठी इथे राहणार होते. सागरचे वडील बाळासाहेब एका बँकेत नोकरी करत होते पण सागर साठी त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली होती. आणि आई घर काम करत होती. शास्त्रीसरांना फोन केल्यावर त्यांनी त्यांचे जिवलग मित्र बाळासाहेबांविषयी इतकेच काय ते सांगितले. सागरला नेमका काय आजार आहे आणि कोणता उपचार घेण्यासाठी ते इथे आलेत त्याची उत्सुकता पुन्हा आमच्या सर्वांच्या मनाला भेडसावू लागली. त्याच्या तब्बेती वरून तो आजारी असल्या सारखे वाटत नव्हता. आम्ही पण जास्त चौकशी करण्याच्या भानगडीत पडलो नाही.

कितीही ठरवले कि दुसऱ्याच्या प्रकरणात लक्ष नाही घालायचे तरीही हळूहळू एक एक माहिती बाहेर येवू लागली. सागरला कोणता तरी मानसिक आजार होता, तो सदानकदा गप्पच असायचा. कोणाशीही बोलायचा नाही, घराबाहेर यायचा नाही, कधीतरी खिडकीतून बाहेर बघत बसलेला असायचा, शून्यात नजर लावून. त्याची आई काहीतरी कामानिमित्त कधीतरी घराबाहेर यायची, पण लगेचच घरात जायची. त्यांच्या चेहऱ्या वरून त्या बोलक्या स्वभावाच्या वाटत होत्या पण बहुदा तरकट वडिलांच्या धाकामुळे कोणाशी बोलत नसाव्यात. त्याला उपचारासाठी नेतेवेळी जो काही दरवाजा उघडला जायचा तेव्हाच त्या सर्वांचे दर्शन व्हायचे, इतरवेळी दरवाजा बंदच असायचा.

एक दिवस दुपारीच मी माझ्या आई सोबत बाजारात गेलो असता योगायोगाने सागरच्या आई बाजारात औषध घेत असताना दिसल्या. आणि एकट्याच असल्यामुळे असेल कदाचित आम्हाला ओळखून हसल्या. म्हणून आई आणि मी त्यांच्या जवळ जावून विचारपूस केली तर त्यांच्या डोळ्यातून पाणीच आले. त्यांना बऱ्याच दिवसानंतर बोलायला थोडा वेळ मिळाल्या मुळे त्या सविस्तर पणे आमच्याशी बोलू लागल्या. त्यांच्या बद्दल असलेल्या माझ्या अंदाजाप्रमाणे त्या खरेच

बोलक्या स्वभावाच्या होत्या पण त्यांच्यावर आलेल्या परिस्थिती मुळे त्यांना असे जीवन जगावे लागत होते.

शेजारच्या एका बंद दुकानाच्या पायरीवर बसून त्या आमच्या समोरच आपले मन मोकळे करत होत्या. त्यांच्या तोंडून त्यांची व्यथा ऐकून, गरम तेलात पाण्याचा थेंब पडल्याप्रमाणे मनात चर्रर झाले. त्यांचे बोलणे संपवून त्या आमच्या सोबत न येता एकट्याच आपल्या घरी गेल्या, त्यानंतर आम्हीपण थोड्यावेळाने राहिलेली खरेदी करून आमच्या घरी गेलो.

बाजारातून येवून बसलो होतो इतक्यात समोरच्या घराकडे लक्ष गेले. तर सागर आपल्याच तंद्रीत खिडकीतून बाहेर बघत बसला होता. त्याच्या आईचे बोलणे मनातून जातच नव्हते. त्याच्याकडे बघताच मला त्याच्या आईच्या बोलण्या-तला चार पाच वर्षा पूर्वीचा सागरच दिसू लागला. अभ्यासात बऱ्या पैकी हुशार असणारा सागर त्याच्या आई वडिलांना एकुलता एक होता. वडिलांसारखाच त्याचा स्वभाव शांत आणि हळवा होता. त्यामुळे त्याला मित्र पण जेमतेमच होते. बारावीला चांगले मार्क्स मिळवल्यानंतर सी.ए. होण्याचे स्वप्न घेवून तो बी. कॉम. च्या पहिल्या वर्षाला जावू लागला. कॉलेज सुरु होवून दोन तीन महिने झाले असतील, वीसेक किलोमीटर अंतरावर असलेल्या शहरात एक कसले तरी प्रदर्शन बघायला बरेच मुले आणि शिक्षक गेले होते. सागर आणि त्याचा एक मित्र मोटर सायकल वरून गेले होते. परत येई पर्यंत सागर तापाने फणफणला होता. पावसात भिजल्यामुळे ताप आला असेल म्हणून आई वडिलांनी डॉक्टर कडे दाखवले; पण त्याचा ताप कमी होतच नव्हता. तशा तपातच तो एक दिवस बेशुद्ध झाला, म्हणून मोठ्या दवाखान्यात दाखविण्यात आले. दोन तीन दिवसांनी तो शुद्धीवर आला, त्यानंतर तो असा विचित्र वागू

लागला. कोणाशीही बोलत नव्हता, शून्यात नजर लावून बसत होता. कधी कधी रात्री अपरात्री उठून डायरीत काहीतरी लिहित बसायचा आणि ती डायरी लपवून ठेवायचा. आई वडील जास्त बोलले तर चिडचिड करत होता स्वत:ला मारून घेत होता. "ही वाट दूर जाते, मला जायचेय त्या दूरच्या वाटेवरून, मी जाणार, स्वत:ला संपवून." असे बडबडत आत्महत्त्या करण्याची भाषा करत होता. त्यामुळे त्याचे आई बाबा हतबल झाले होते. वेगवेगळे डॉक्टर, वैद्य, उपास-तपास, नवस सर्व काही झाले तरी त्याच्या वागण्यात फरक पडत नव्हता.

जसजसे दिवस सरत होते तसे सागरची मानसिक परिस्थिती बिघडतच चालली होती. त्याचे विक्षिप्त वागणे त्याच्या आईच्या ताकदीच्या बाहेर गेले होते. चार पाच वेळा त्याने आत्महत्त्येचा केलेला प्रयत्न बघून बाळासाहेब म्हणजे सागराच्या बाबांना बँकेतली चांगली नोकरी सोडावी लागली होती. अकाली निवृत्ती स्वीकारावी लागल्यामुळे आणि सागरच्या दवाखान्याच्या खर्चामुळे पैशाची चणचण भासू लागली. त्यामुळे बाळासाहेबांचा शांत असणारा स्वभाव चिडचिडा आणि तरकट झाला. सागरच्या वागण्यामुळे त्यांना त्याच्या सोबतच राहणे अनिवार्य होवू लागले. त्याला काय झालेय कुणालाच कळेनासे झाले. आई वडील कोणाशी तरी बोलू लागले आहेत असे समजताच ते स्वत:विषयीच बोलतात असे वाटून सागर त्रास करून घेत असे. त्यामुळे त्यांना पै-पाहुण्यांशी, मित्रांशी आणि इतर लोकांशी संपर्क ठेवणे देखील मुश्किल होवू लागले. आपले आई बाबा बाहेरच्यांशी फटकून वागतात असे दिसले की त्याला बरे वाटत होते. त्यामुळे त्यांना स्वत:चे जीवन जगणे देखील मुश्किल झाले होते पण मुलाच्या सुखासाठी ते दोघेही आपला मूळ स्वभाव बदलून सहन करत होते.

शास्त्रीसरांच्या सल्ल्यानुसार आमच्या शहरातल्या एका चांगल्या मानसोपचार तज्ञाकडे उपचारासाठी ते इथे आले होते. उपचार पूर्ण होईपर्यंत आमच्या समोर रिकामे असलेल्या सरांच्या या घरात ते राहणार होते.

*****

सागरच्या विचारात मी किती वेळ सागर किनाऱ्यावर बसलो होतो कळलेच नाही. घड्याळ बघतो तर संध्याकाळचे सात वाजून गेले होते. लगेचच उठून हॉटेलकडे परतलो. गेले चार दिवस असणारे इथले ऑफिसचे काम संपवून आज घरी जाणार होतो म्हणून लवकरच आलो होतो, रात्रीची बस असल्यामुळे मिळालेल्या वेळेत जवळच असणाऱ्या समुद्राकाठी जावून बसलेलो. आधीच आवरून ठेवलेली बॅग घेवून हॉटेलची रूम सोडून, जेवलो आणि बस पकडून घरी गेलो. पहाटे साडेतीन-चार वाजता घरी पोहोचल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी उशिराच उठलो. आवरून ऑफिसला जाण्यासाठी तयार होवून बसलो होतो.

इतक्यात समोरच्या घराकडे लक्ष्य गेले, तर घराला कुलूप. आई-बाबांना विचारताच; त्यांनी रात्री बारा एक वाजता सागरला एका अम्बुलन्स मधून घेवून गेल्याचे समजले, आणि काळजात धस्स झाले. नेमके काय झाले असेल कुणालाच कळाले नाही.

गेल्या चार दिवसाचा टूर रिपोर्ट ऑफिस मध्ये जमा करून इतर कामे करत बसलो होतो, पण सारखा सागरचाच विचार डोक्यात येत होता.

नक्की काय झाले असेल, याने स्वत:चे काही बरे-वाईट तर करून घेतले नसेल ना. माहिती काढावी म्हटले तरी कुणाला विचारावे, विचार करून डोके सुन्न झाले होते. कामात लक्ष्य लागत नसल्यामुळे ऑफिसातून लवकरच घरी गेलो. घरात जात असता कुलूप लावलेल्या सागरच्याच घराकडे लक्ष्य गेले. आवरून पुन्हा दारात येवून बसलो. इतक्यात समोरच्या घराच्या खिडकी जवळ असणाऱ्या पारिजातकाच्या झाडावर कसली तरी वही अडकलेली दिसली. कोणी पहायच्या आधीच पटकन ती वही घेवून घरी आलो. खाडाखोड केलेली, मधेच पाने फाडलेली काही वेळा सुवाच्य अक्षरात लिहिलेले तर काही पाने गचाळ अक्षराने खरडलेली ती जुनाट डायरी सागरचीच होती. ती डायरी जशी वाचता येईल तशी वाचत होतो, त्यात मधेच 'ही वाट दूर जाते, मला जायचेय त्या दूरच्या वाटेवरून स्वत:ला संपवून' असे काहीतरी बऱ्याच पानावर लिहिले होते, खोडलेले होते. काही चित्रे गिरगीटली होती, वाहत्या पाण्यासारखी, पुलाची, मुलीची, फुलांची, झाडाची अशी कशाचाही अर्थ न-लागणारी. लिहिलेली पाने वाचायला सुरुवात केली तर पानांचा क्रमच कळत नव्हता. कधी पुढच्या तर कधी मागच्या तर कधी मधल्या पानावर, तर कधी उलट सुलट असे लिहिलेले होते.

शांत पाण्यावर फेकलेला चपटा दगड जसा पाण्यावर चार पाच टप्प्यांनी आघात करत पाण्यात खोलवर घुसतो, तशी मनावर असंख्य आघात करत हृदयात घुसणारी वेगळीच कहाणी त्या डायरीतून समोर येवू लागली. त्या डायरी मुळे मानसोपचार तज्ञांना त्याच्या वरील उपचारासाठी काही मदत होईल म्हणून शास्त्रीसरांशी संपर्क साधला. तर रात्री सागरने

केलेला आत्महत्त्येचा प्रयत्न त्याच्या दृष्टीने यशस्वी झाल्याचे शास्त्रीसरांकडून ऐकल्यावर छाती धड धडू लागली. डोळ्यातून अपोआप अश्रूंची सरिता वाहू लागली. अशा तऱ्हेने एक सागर नावाचे नैराश्याचे पर्व अकाली संपले होते, बरेच प्रश्नचिन्ह ठेवून, जे थोड्या फार प्रमाणात मला उलगडले होते.

पुन्हापुन्हा ती डायरी वाचू लागलो आणखी काही अर्थ निघतो का म्हणून. जस जसा त्याची डायरी वाचून त्यातील लिखाणाचा अर्थ लागू लागला, तसा सागरच आपली कहाणी सांगत असल्याचा मला भास होवू लागला.

*****

जणू तो बोलत होता आणि मी ऐकत होतो,

बारावी पूर्ण झाल्यानंतर मी कॉलेजला जावू लागलो. कॉलेज सुरु होवून चार पाच दिवस झाले असतील, इतक्यात आमच्या वर्गात एक मुलगी आली, सरिता. एकदम साधी. तेल लावून वेणी घातलेल्या केसात पारिजातकाच्या फुलांचा गजरा घातलेली आणि साधे कपडे घातलेली. ती आत आल्यानंतर अगदी शेवटच्या बेंच वर जावून बसली. कोणाशीही बोलत नव्हती, काही विचारले तर जेमतेमच उत्तर द्यायची. क्लास मधील मुले तिला चाची म्हणून चिडवत होती. ती आली कि तिला 'चिकणी चुपडी, चिकणी चुपडी चाची' म्हणून चिडवायचे तरी ती काहीही प्रतिसाद न देता, खाली मान घालून जायची, तक्रार पण करत नव्हती. का माहित नाही पण तिच्या विषयी मला काही वेगळेच वाटायचे, म्हणजे नेहमी ती कसल्यातरी

दडपणाखाली असल्यासारखी वागायची. त्यामुळेच असेल कदाचित, तिला चीडवणाऱ्या त्या मुलांचा मला राग यायचा. शक्यतो क्लास मध्ये येतानाच उशिरा यायची आणि क्लास संपताच लगेचच जायची, त्यामुळे तिला काही विचारावे म्हटले तर तिच्या सोबत बोलायला मिळायचेच नाही. आणि मी जरी कधी तिच्याशी बोलायचा प्रयत्न केला तरी ती बोलत नव्हती. मी पण मागच्याच बेंच वर बसायला लागलो. माझे लक्ष तिच्याकडेच असे, मला एक कळत नव्हते ती क्लास सुरु असताना नकळत मध्ये मधेच रडल्यासारखे वाटायची. काही दिवसांनी इतकेच कळले कि, हेड मास्तर असलेल्या तिच्या बाबांची नुकतीच इथल्या सरकारी शाळेत बदली झाली होती. ती फारच लहान असताना तिची आई वारल्यामुळे ती आणि तिचे बाबा दोघेच राहत होते, त्यामुळे सगळे घरकाम करून ती कॉलेज मध्ये येत होती.

क्लासेस संपून अर्धा-एक तास झाला तरी आज पाऊस काही थांबत नव्हता. सगळेजण आपापल्या सोयी प्रमाणे पावसातूनच निघून गेले होते. मी पण निघायचे म्हणून छत्री उघडली, इतक्यात क्लासच्या खिडकीतून सरिता पहात असल्याची दिसली. तिच्याकडे छत्री नसल्यामुळे ती क्लास मधेच उभी होती. मी तिला घरी सोडण्याविषयी विचारले, बरेच आढे-वेढे घेत शेवटी ती माझ्यासोबत येण्यास तयार झाली. पावसात तिच्या सोबत छत्रीतून जात असताना कोमेजलेल्या पारिजातकाच्या फुलांचा मंद सुगंध येत होता. शाळेजवळच असणाऱ्या घराचे दार वाजवताच तिच्या बाबांनी दरवाजा उघडले. ती पटकन घरात गेली, मी त्यांना माझी ओळख करून दिली, त्यांनी 'ठीकाय' असे म्हणून दरवाजा बंद करून घेतला. दोन-तीन दिवस झाले तरी ती कॉलेजला आली नाही. म्हणून मी तिच्या घरी गेलो तर घराला कुलूप होते, अचानक बाहेर गावी गेले असतील बहुतेक.

आठ दहा दिवसानंतर शेजारच्याच शहरात असणारे एक प्रदर्शन बघायला मी आणि माझा एक मित्र गेलो होतो. प्रदर्शन संपल्यानंतर माझा मित्र तिथेच राहणाऱ्या त्याच्या नातेवाईकांकडे गेल्यामुळे मी एकटाच मोटरसायकल वरून घरी येत होतो. दुपारी सुरु झालेला पाऊस थोडा कमी झाला होता, अंधार पडू लागला होता. शहराबाहेर येताच कुणीतरी गाडी थांबवण्यासाठी हात करत होते. त्या निर्जन रस्त्यावर एक बाई आणि त्या हात करणाऱ्या माणसाशिवाय कोणीच दिसत नव्हते, म्हणून बाईक थांबवली.

"माझ्या मुलीला नदीजवळ सोडता का?" त्या माणसाने विचारले.

मी "हो", म्हणताच त्या माणसाच्या आणि बाईच्या मागे उभी असलेली एक मुलगी माझ्यामागे बसली.

मी निघालो, काही वेळाने मला पारिजातकाच्या फुलांचा सुगंध आला, अगदी तसाच त्या दिवशी पावसात आला होता तसा.

"कसे आहात, बरे आहात का?" तो आवाज सरिताचाच होता.

माझ्या मागे सरिताच आहे हे जाणवताच, मी दचकुन "हो, तुम्ही कसे आहात? आणि कुठे गेला होतात आठ दहा दिवसापासून?"

"ही वाट दूर जाते ना, तिथे गेले मी, स्वप्नामधील गावात,"- ती.

"म्हणजे? ही वाट दूर जाते; स्वप्नामधील गावा, माझ्या मनातला का; तेथे असेल रावा. असे म्हणायचे आहे का तुम्हाला."- मला काहीच कळाले नाही म्हणून विचारलो.

"नाही, तसे नाही पण सांगते, सगळं काही सांगते, बरंच लांब जायचंय आपल्याला तो पर्यंत सगळं सांगते."- ती.

मला खरंच वाटत नव्हते की काय घडतंय, सरिता माझ्या सोबत बाईकवर बसली होती. हा भास होता कि चमत्कार, कि ती म्हटल्यासारखे स्वप्नातल्या गावात जाणाऱ्या वाटेवरून आम्ही जात होतो? पण ती असं का म्हणत होती, "ही वाट दूर जाते, तिथे गेले मी, स्वप्नातल्या गावात," ती पण अगदी मनमोकळे पणाने बोलत होती, कॉलेज मधल्या तिच्या अबोलपणाला एकदम विपरीत होते तिचे वागणे.

मी शांत पणे तिचे बोलणे ऐकत बाईक चालवत असताना कळले की, तिच्या जन्माच्या वेळीच तिची आई गेल्यामुळे तिचे बाबा तिच्यावर रागराग करायचे. इतके की तिला मारायचे सुद्धा. तितकेच प्रेम देखील करायचे तिच्यावर. त्यांचा स्वभाव विक्षिप्त झाला होता पत्नीच्या निधनानंतर.

त्यांना जेंव्हा राग यायचा तेंव्हा ते तिला, " जन्मताच माझ्या बायकोला म्हणजे स्वत:च्या आईला गीळलीस, आता मला पण गीळणार आहेस काय?" असे आणखी बरेच काही म्हणायचे. आपलेच बाबा आहेत त्यांच्या भावना आपल्या शिवाय कोण समजणार असं विचार करून ती सारं काही सहन करत होती.

त्या दिवशी पण असेच झाले होते, मी तिला घरी सोडल्याबद्दल त्यांना तिचा राग आला होता आणि तिला वाईट वाईट बोलून इतके मारले होते की त्याच रात्री ती घरातून पळून गेली होती.

तिचे बोलणे अडवत मी मधेच विचारले, "त्यानंतर कोठे गेलात तुम्ही? आणि सध्या बाबा कुठे आहेत?"

ती -" सध्या आम्ही एकत्रच असतो, आई बाबा आणि मी. आत्ता मला तुमच्यासोबत पाठवणारे ते बाबाच होते माझे, माझ्या आई सोबत. मी

पण पहिल्यांदाच बघितलं तिला, माझ्या आईला. तुमच्यामुळेच, तुम्ही त्या दिवशी मला घरी सोडले नसते तर हे घडलेच नसते कदाचित."

मला त्या माणसाचा चेहरा तिच्या बाबांसारखाच वाटला होता, पण मी पाऊस असल्यामुळे निरखून पहिला नव्हता. आणि बहुतेक मला पण त्यांनी ओळखले नसावे.

"म्हणजे तुमच्या बाबांनी दुसरे लग्न केलं का?" - मी.

“छे हो, तसं करायचं असतं तर तेंव्हाच केलं असतं, माझ्या लहानपणीच" - ती.

"तुम्हाला तुमच्या घरी सोडू ना?" - मी विषय बदलण्यासाठी विचारलो, कारण तिचं बोलणे काहीच कळत नव्हते.

"नको इथेच सोडा मला नदीजवळच, आई बाबा पण आलेतच आपल्या पाठोपाठ." - ती.

नक्की काय प्रकार असेल याचा विचार करत होतो. बराच अंधार झाल्यामुळे जोरात बाईक चालवत निघालो होतो.

नदी जवळ येताच गाडी थांबवली डोक्यात राहून राहून एकाच विचार येत होता, "इथे नदीजवळ काय काम असेल हिचे? त्या दिवशी ही घर सोडून कुठे गेली असेल आणि इतके दिवस कुठे गेले होते हे?"

"अहो सांगते म्हटले ना? सारखा तोच तोच विचार काय करताय मनातल्या मनात." – ती हसत म्हणाली.

आता माझ्या मनातले हिला कसे काय कळले असा विचार करत होतो.

"एवढा विचार करण्यासारखं काहीच नाही, मी स्पष्टच बोलते." ती, " त्या दिवशी तुम्ही मला सोडायला घरी आलात हेच कारण झाले बाबांना, मला रागावण्यासाठी. त्या दिवशी इतके रागावले, इतके मारले कि मी ठरविले तिला आज बघायचंच, जिच्यामुळे बाबा माझा तिरस्कार करतात तिला बघणारच. पण बघणार कसे, म्हणून मी जशी नुकतीच घरी आले होते तशीच घरातून पळत सुटले. बाबा पण घराला कुलूप लावून माझ्या मागेच आले. मी इथे नदीजवळ आले इतक्यात मला ती बोलवत असलेली दिसली, माझी आई. ते बघा तिथे, दिसली का? तिथे त्या पाण्यात, दोन्ही हात पुढे करून मला मिठीत घेण्यासाठी आतुर असलेली. बाबा मला थांबवत होते पण मला ओढ लागली होती आईला भेटण्याची. म्हणून मी इथूनच उडी मारली होती या इथूनच, या पाण्यात. माझ्या पाठोपाठ बाबांनी पण उडी मारली होती इथूनच, हे बघा अशी."

"ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा. माझ्या मनातला का तेथे असे विसावा."

असे म्हणत तिने हसत हसत त्या पुलाच्या कठड्यावरून त्या दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत स्वत:ला झोकावून दिले. उडी मारताच नदीतील पाणी माझ्या अंगावर उडाले, आधीच पावसाच्या पाण्याने भिजलेले माझे अंग पुन्हा भिजले, आता सरितेच्या पाण्याने.

मला पण इच्छा होत होती तिच्या पाठोपाठ त्या दुरवर जाणाऱ्या वाटेवरून, स्वप्नामधील गावात जाण्याची. पण मी बघत होतो स्तब्धपणे, फक्त बघत होतो. थरथर कापणाऱ्या अंगाने बघत होतो. एक सरिता वाहात होती; दुसरी सरिता पण वाहात होती सरिते सोबत, सरीतेत सामावून, सागरला सोडून सागराला मिळण्यासाठी.

घाबरून पटकन बाईक वर बसून घरी निघालो पण मन म्हणत होते.

"ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा, स्वप्नामधील गावा,

माझ्याही मनातला का तेथे असे विसावा, तेथे असे विसावा."!!!!!"

(२८/१०/२०१५)

वचनबंदी

आबा गेले, कोंबडं आरवायच्या वक्ताला गेले !!!

न्हाणीघरात पाय घसरून पडले. डोस्क्याला खोक पडलं.

फरशीवर डोस्क आपटून खोक पडलं, आन गेले म्हणं.

जाग्यावरच.....

कुणातर्फेतरी ताबडतोब माईला तसा सांगावा धाडला.

माई म्हंजे आबांची बायको. आदल्याच दिवशी मावळतीच्या वक्ताला लेकीकडं गेलेली, चार-दिस रहायचं म्हणून. खरं म्हंजे आबा बी माईसोबत लेक आन जावईबापूंकडे जाणार होते.

पर अचानक तालुक्याला जायचं ठरवलं, जमिनीच्या कामानिमित्त. म्हणून तिथलं आणि घरची काही कामं उरकून दोन दिवसांनी जायचं ठरलं.

झुंजू-मुंजु झालं, दिवस उजाडाय लागला तशी गावात बातमी पसरायला लागली.

एक-एक करून माणसं गोळा व्हायला लागली. तोंडाला पदर धरून बाया मागल्या दारानं आत जायला लागल्या.

सूर्याची तिरकी कवळी किरणं अंगावर यायला लागली..

सदू-म्हादु आबांची दोनी पोरं, दाराबाहेरच्या कट्ट्यावर भिताडाला टेकून बसलेले. दुमडलेल्या पायाला दोनी हातानं आकडा घालून, हनुवटी गुढघ्यावर टेकून मुटकुळं मारून बसलेले. येणाऱ्या-जाणाऱ्याकडं बघत बसलेले. येणारी माणसं त्यांच्या पुढं थांबून, दारातून आत बघून, बाजूला जाऊन बसू लागली. काहीजण गायरा-म्हसरांच्या धारा काढायला, सकाळची कामं आवरायला परत गेली.

सगळेजण माई, अक्का आणि दाजीसाठी खोळंबल्याले होते.

इकडं घराच्या आतमध्ये; मार लागलेल्या डोक्याला कापड गुंडाळून आबांचं प्रेत ओसरीत झोपवले होते. बाजूला त्यांच्या दोनी सुना तोंडाला पदर लावून बायकांच्या गराड्यात बसल्या होत्या. एवढ्या गलबलाटात सुद्धा सदू आनी म्हादुची तिन्ही पोरं माजघरात शांतपणे झोपली होती.

एवढ्यात, तात्या आला, शेतावरच्या घरात राहाणारा तात्या आला.

डाव्या अंगाला लखवा मारलेला तात्या आपल्या पोराच्या आधारानं आला. तात्या म्हंजे आबांचा भाऊ. आबाच्या पाठचा, पाच-सहा वर्षांनी धाकटा. सोबत काकी, तात्याची सून आणि तात्याचा मधला आणि धाकला पोरगासुद्धा होता.

दारात येताच तात्यानं आपल्या वाकड्या झालेल्या तोंडानं,

”काय ईपरीत घडलं रे पोरांनो.” म्हणत आणि दोनी पोरांना धरून हंबरडा फोडला,

"माझा आबा. . . . काय झालं हे."

आलेली सगळीजण तात्यासोबत आबाच्या बाजूला जाऊन बसली.

आत जाणाऱ्या तात्याकड बघत, म्हादू सदूच्या कानात पुटपुटू लागला,

"आला बघ नाटकी ! ह्याला बघून घिवू का आत्ताच, ह्या वाकड्याला." सदूनं म्हादूचा हात दाबला आणि त्याला गप बसवला.

म्हादू पुन्हा पुटपुटू लागला, "सोड रं दादा तू, काय त्यो निकालंच लावून टाकतो आज."

"खुळा हाईस का म्हाद्या? गप बस की, आता ही काय वेळ हाय का? अख्खा गाव गोळा व्हायला लागलाय. मागनं काटा काडू कि ह्याचा बी ." – सदू

"दादा गप कि, ऐकू जाईल लोकानला, मोठ्यानं बोलू नको. हे काय मी बळंन केलंय का दादा?, नुसता धक्का दिला तर न्हाणीत डोस्क्यावर आपटून पडलं म्हातारं.” -म्हादू.

दोघेही पुन्यांदा सुतकी भाव तोंडावर आणून गप बसले.

आपल्या तिन्ही पोरांसोबत काही वेळाने बाहेर आलेला तात्या सदूच्या बाजूला बसला. कुणीच काही बोलले नाही. तात्याची तिन्ही पोरं घरासमोर जमलेल्या गर्दीत मिसळून गेली.

आबांना वेशीबाहेर नदीकडला न्यायची सगळी तयारी झाली.

उगवतीकडून येणारी सूर्याची तिरकी किरणं आता सरळ होऊन डोकीवर चढायला लागल्यानं चांगलाच चटका द्यायला लागली. म्हणून घरासमोर जमलेली काही माणसं समोरच्या भल्या मोठ्या चिंचेच्या झाडाखाली, आणि काही मिळंल तिथं सावली हुडकून बारकी बारकी टोळकी करून बसू लागली. येऊन बराच वेळ झालेले हलगीवाले उन्हाला हलगी शेकायला ठेवून सावलीत बसले. सगळेजण आता फकस्त माईची वाट बघत बसले होते.

काही वेळाने एक रिक्षा येताना बघताच; सदू-म्हादू जागेवर उठून थांबले.

रिक्षा घराजवळ येताच आजूबाजूला बसलेल्यातले काही माणसं उठून उभी राहिली. रिक्षा चिंचेखाली थांबताच त्यातून माई, अक्का उतरून घराकडे येऊ लागल्या. त्यांच्या सोबत उतरलेल्या दाजीने रिक्षाचे पैसे दिले, त्या शांत वातावरणात 'टुर्रर्रर्रर्र - - - ' असा आवाज काढत ती रिक्षा निघून गेली.

दाराजवळ येताच माई-अक्का गळा काडून जोरजोरात रडू लागल्या.

त्यांच्याकडे बघत तात्या वाकड्या तोंडाने, "लै ईपरीत झालं ओ वैनी!" असे म्हणत भिताड धरून उठायचा प्रयत्न करू लागला. सदू-म्हादू पुढं झाले आणि त्या दोघींना धरून आत घेऊन गेले. माई आणि लेकीला बघताच आतमध्ये बसलेल्या बायकांचा एकच कोलाहल सुरु झाला. काही वेळाने सदू-म्हादूला घेऊन दाजी बाहेर आला, आन तात्याच्या बाजूला बसला.

"आधीच लै येळ झालाय, लोकं खोळंबलीत. उचलुया का बघा?"

सदू दाजीला बाजूला घेऊन गेला, आन दाजीच्या कानात बोलला. दाजीनं हलकीच मान हलवली. गोळा झालेल्या लोकांच्यावर नजर फिरवून दाजी जवळच थांबलेल्या एका म्हाताऱ्याच्या कानात काहीतरी कुजबुजला. आणि दाजीचं ऐकताच म्हाताऱ्याने झालेल्या तयारीवर नजर टाकून, हातानं खूण करून काही तरुण पोरांना बोलावले. त्या घोळक्यातून काही लोकं उठून पुढे आले.

"घ्या रं पोरांनु आवरायला, ऊनाचा कडाका वाढाय लागलाय. आता टाइम लावू नका."

तो म्हातारा काही तरुण-पोरांकडे बघत म्हणाला. त्यातल्या एका तरुणाने जरासं लांब जाऊन फटाक्याची माळ पेटवली. फटाक्याचा आवाज ऐकताच, दातात काडी घालून दात टोकरत बसलेले हलगीवाले गावच्या नेमानुसार हलगी वाजवायला लागले. हलगी बेसूर कडकडाट करत शांततेचा भंग करून आणखी भयानकता वाढवू लागली. विखुरलेले लोकं पुन्हा एकत्र येऊन गर्दी करू लागले.

दाजी-सदू-म्हादू आणि आणखी काही लोकं आत गेले.

जाऊन आबांभोवती बसलेल्या बायकांना बाजूला केले. आणि डोळे मिटलेल्या आबांचा मृतदेह रक्तानं माखलेल्या घोंगड्यासकट उचलला. मृतदेह उचलताना चारपाच लोकांसोबत म्हादूने पण आबांच्या उजव्या खांद्याकडं धरून उचलले. आबांची मान थोडीशी उजव्या बाजूला कलली आणि त्यांनी खाडकन डोळे उघडले. ते रागाने म्हादुकडेच बघू लागले. हे बघताच म्हादूचे पाय लटपटायला लागले. आणि म्हादू जोरजोरात ओरडू लागला. कोणीतरी म्हादूला बाजूला घेतले.

म्हादू जवा शुद्धीवर आला तवा आबांचा देह सरणावर ठेवला होता.

कुणीतरी म्हादूच्या हाताला धरून चितेवर लाकडं ठेवत होते. आणि ते होताच सदूने पुढचं कार्य पुरं केलं. नदीकाठचे विधी संपवून घरी आले. सगळे आपापल्या घरी गेले. बघता बघता सूर्य मावळतीला आला. सदू आणि म्हादू दारातच बसले होते. भयानक शांत वातावरण. इतक्यात म्हादू जोरजोरात ओरडू लागला. कारण घरासमोरच्या चिंचेखाली आबा थांबले होते. डोळे मोठे करून रागाने बघत, हातवारे करत आबा म्हादूकडेच येत होते. सगळेजण ओरडणाऱ्या म्हादूजवळ येताच म्हादू विचित्र असे बडबडत त्या चिंचेकडे बोट दाखवू लागला. पण तिथे कुणीच नव्हते. घाबरलेल्या म्हादूला सगळे मिळून घरात घेऊन गेले.

कावळ्याच्या कावकावात घरच्यांचा, भाऊबंदांचा-पावण्यांचा निवद ठेवला.

डोस्क्यावर आलेल्या रणरणत्या उन्हात, सदूने पाणी सोडलं, आणि बाभळीच्या झाडाखाली बसलेल्या लोकांच्यात वाट बघत बसला. तासभर झाला तरी ठेवलेल्या निवदाला आणि पिंडाला कावळा शिवला नाही.

म्हादू फुडं गेला आणि जमिनीवर ठेवल्याला तांब्या उचलला.

तांब्याच्या गळ्यात डावा हात घातला. तांब्या लईच जड लागला म्हणून बघतो तर आबांच्या मानेखाली हात होता. डोळे वटारून आबा म्हादूकड बघत होते. झटका बसल्यागत हातातला तांब्या फेकला आणि लांब गेला. बडबडत त्या तांब्याकडं बोट दाखवू लागला. कुणीतरी तांब्या

उचलला, दोघातिघांनी बडबडणाऱ्या म्हादूला धरला आणि म्हादूच्या हातावर तांब्यातलं पाणी सोडलं आणि म्हादून ते जमिनीवर सोडलं. कावळा शिवलाच नाही.

कुणीतरी एक गाय ओढत-ओढत आणली.

पाच-सहा तास झाले, दाजी, दोन मामांनी, भाऊबंदांनी-पावण्यांनी पाणी सोडलं, तरी कावळा शिवना म्हणून आणलेली गाय पिंडाजवळ नेली तर हिसडा मारून, कासरा ओढून पळून गेली. सगळी माणसं घामानं डबडबली, काय करावं कुणालाच सुचेना झाले.

तिथून हाकलून दिलेला तात्या लांब एका बाभळीच्या बुडाला बसलेला.

मळका टॉवेल डोस्क्याला गुंडाळून लांब झाडाखाली एकटाच बसलेला तात्या दोन्ही हातानी काठी सावरत, धडपडत डावा पाय ओढत पुढे आला. निवदाकड बघत हात जोडायचा प्रयत्न केला. खाली वाकून तांब्या उचलून पाणी सोडणार, पण सदू-म्हादू आडवे आले. तात्याच्या हातातला तांब्या हिसकावून घेऊन त्याला हाकलून काढले. गाव लोकांपुढं तमाशा नको म्हणून तात्या पुन्यांदा लांब गेला. निवद नदीला सोडून सगळे आपापल्या घराकडं निघाले.

सगळेजण घरी गेले तरी तात्या झाडाच्या आडाला उभा होता.

झाडाच्या आडाला उभारलेल्या तात्यानं नदीत लांबवर वाहणाऱ्या निवदाकडं बघितलं. निवद नजरेआड होताच मनातल्या मनात काहीतरी पुटपुटत हात जोडले. आता काहीतरी ईपरीत घडणार असे त्याला वाटू लागल्याने दोन्ही हात थरथरू लागले आणि दरदरून घाम फुटला.

डोक्यावरचा टॉवेल काढून तोंडावरचा घाम पुसला आणि परत डोक्याला गुंडाळून, हातातली काठी वाळूत रुतवत, लटपटणारे पाय ओढत निघाला.

*****

आबा-तात्या म्हंजे राजाबा आणि बजाबा दोघा भावांचे एकमेकांवर अपार प्रेम....

सख्खे भाऊ... मुलं झाल्यापासून मुलांवरच्या प्रेमापोटी एकमेकाला ते आबा आणि तात्या म्हणूनच बोलवू लागले. आई-बाप गेल्यावर आबानंच तात्याला मोठ्ठ केलं. आपल्या आणि दुसऱ्याच्या शेतात राब-राबून आपल्या चारी बहिणींची लग्नं केली. स्वतःच्या लग्नाच्या मांडवातच भोळ्या तात्याचं सुद्धा लग्नं लावून दिलं. बाजूला वाहणाऱ्या नदीवानी, काळासोबत निघून गेलेल्या घटना नजरेपुढं सरकत चाललेला तात्या मधेच थांबून मळक्या सदऱ्याच्या बाहीला डोळे पुसत हळूहळू घराकडं चालला होता.

काळ सरकत गेला, बघता-बघता पोरं मोठ्ठी झाली.

आणि दिवसही बदलले. सदूचे आणि तात्याच्या थोरल्या पोराचे लग्न झाले, म्हादूला पण कळायला लागले. तात्याची बारकी दोनी पोरं वरच्या शाळेसाठी बाजूच्या गावात जायला लागली. घरात दोनच्या चार बाया झाल्या. घरातल्या वाजणाऱ्या भांड्यांचा आवाज घराबाहेर येऊ लागला.

रोजचा वाजणारा कलकलाट ऐकून आबा-तात्याला काही कळेनासे झाले. दोघांच्यामधली नात्याची घट्ट असणारी शिवण, काळाच्या कैचीने कापावी लागली. मन घट्ट करून तुटलेल्या धाग्याचे मनावर उठलेले वळ

सहन करत आबाने भोळ्या तात्याला शेतावरच्या घरात राहायला धाडले. तात्या काकी, पोरं आणि सुनेला घेऊन शेतावरच्या घरात राहायला लागला.

वारसाहक्काने आलेल्या शेतीची वाटणी झाली. आबानं आपण स्वतःच्या मेहनतीनं घेतलेल्या शेतीची समान हिश्श्यात वाटणी करायची ठरवली आणि सदू-म्हादू चिडून उठले. नको म्हणत असताना सुद्धा तात्याच्या नावानं निम्मा हिस्सा दिला. आबाचा मोठेपणा बघून तात्यानं आपला गावातल्या घरावरचा हक्क सोडला.

तिथूनच संघर्षाच्या वणव्याची ठिणगी पडली.

'भोळेपणाचा आव आणून तात्यानं आबांना फसवलं आपल्याला जुनं घर देऊन आपली शेती हडपली.' असे समजून सदू-म्हादू तात्यावर भडकले, आणि हिशेब चुकता करण्याची भाषा बोलू लागले. त्यात आबांनी तात्याची बाजू घेतल्यानं मामला आणखीनच चिघळला. सदू-म्हादू आबा-तात्याविरुद्ध कोर्टात दावा ठोकायची भाषा बोलू लागले.

घरातला तंटा कचेरीला जाणार, या विचारानं तात्याला लखवा मारला.

"माझी जमीन माझ्या भावाला दिल्यावर कोण आडवं येतंय बघतोच मी." म्हणत आबा रीतसर कागद करायला तालुक्याला गेले. कागद व्हायला दोन-तीन दिवस लागणार आणि एकदा का कागद बनला तर आपल्याला काहीच करता येणार नाही. याची माहिती म्हादूला मिळाली.

आणि त्याच रात्री आबा गेले, कोंबडं आरवायच्या वक्ताला गेले.

न्हाणीत पाय घसरून पडले आन गेले म्हणं.

*****

आबाचं तेरावं झालं आणि सुतक संपलं; पै-पाव्हणे परत गेले.

त्या दिवशी मावळतीला शेताच्या बांधानं म्हादू घराकडं चाललेला. बांधाच्या बाजूलाच तात्याचं कौलारू घर होतं, जेम-तेम दोन-तीन खोल्यांचं पण नवं घर.

"म्हादू बरा हाईस लेका? येत जा घरला. माझ्या मनात काय बी न्हाई र पोरा. सोड दुस्मनी. समद्या पोरांनी एक व्हा पोराहो." परड्यात बाजल्यावर बसलेला तात्या म्हादूला म्हणाला. त्याच्या बोलण्याकडं दुर्लक्ष करून तात्याच्या नावानं मोठमोठ्यानं शिव्या घालत म्हादू चालला. गोठ्यात म्हशींची धार काढणारा तात्याचा थोरला आणि सून, कुणी काहीच बोललं नाही.

जरासं पुढं गेल्यावर वडाच्या झाडावर सळसळ जाणवली.

शिव्या घालणारा म्हादू थांबला आणि इकडं-तिकडं बघू लागला. तर बाजूलाच काहीतरी धप्पकन पडले. बघतो तर बाजूलाच झाडावरनं उडी मारून आबा, म्हादूकडेच डोळं वटारून रागानं बघत होते. भ्यालेला म्हादू जिवाच्या आकांतानं ओरडत पळू लागला, पळताना बाजूच्या पिकातून त्याच्या सोबत पळणारी सळसळ त्याला जाणवत होती. घरात घुसल्यावर त्याच्या मागचा पाठलाग थांबला.

तापानं फणफणलेला म्हादू काहीच बोलला नाही.

कसेबसे चार घास खाऊन लगेचच आडवा झाला. मधेच रात्री जाग आली, बघतो तर बाजूला कुणीतरी झोपले होते. निरखून बघू लागला तर, आबा त्याच्याकडे रागानं बघत त्याच्या बाजूला झोपलेले. जोरजोरात ओरडू लागला, सगळेजण त्याच्या जवळ आले. तो जिकडे हात करून बघत

ओरडत होता तिथे तर कोणीच नव्हते. म्हादूच्या एका बाजूला सदू आणि दूसऱ्या बाजूला माई झोपली.

सकाळी सगळेजण उठले म्हादू तरी अजून झोपलेला, तापानं फणफणलेला.

सदू शेताला गेला. काहीवेळाने म्हादू पुन्हा समोरच्या चिंचेच्या झाडाकडे हात करत ओरडत उठला. तर तिथे कुणीच नव्हते.

म्हादूची तब्बेत खराब झाली, खाल्लेलं पोटाला लागेना.

वैद्य, बुवा, गुरव सगळ्यांना दाखवलं, कोंबडं, बकरं, लिंबू सगळ्यांचा उतारा झाला तरी फरक पडेना. म्हादूच्या ह्या परिस्थितीने घरच्यांना काळजी वाटू लागली. त्या काळजीने सदू पण खंगायला लागला.

आबाचं भूत म्हादूच्या मागं लागलंय!!

अशी गावात बोंबाबोंब सुरु झाली, आणि तात्याला पण कळली.

एक दिवस शेतात काम करणाऱ्या सदूला तात्यानं बघितलं आणि पोराची अवस्था बघून हादरलाच. सदू एव्हढा खंगलाय तर म्हादूची अवस्था काय झाली असंल. दोन-तीन दिवस दिवस-रात्र विचार करून पण तात्याला काहीच सुचेना, आणि मन स्वस्थ बसेना !

"आपलीच पोरं हायीत ती, बघवत न्हाई दोघांकडं. दोघं वाचलीच पायजेत."

कायपण झालंतरी आज ह्यो मामला मिटवायचाच म्हणून तात्यानं ठरवलं.

मावळतीच्या टायमाला, लोखंडी फडताळात ठेवलेली घराची अन शेताची जुनी कागदं बंडीच्या खिशात कोंबली आणि हातात काठी घेऊन धडपडत निघाला. भांडण वाढलं तर तात्याला धोका हुईल म्हणून काकी अन तात्याची पोरं तात्याला अडवत होती, पण तात्या ऐकत नव्हता.

हातातली काठी आणि स्वतःचा तोल सावरत तात्या रडत होता.

"आपलं घर टिकवायचं हाय. ती दोघंबी आपलीच पोरं हायीत, काय करतील ते करू देत मला. मोठ्ठ आकरीत घडायच्या आधी वाचावायचं हाय." आपल्या बायको पोरांपुढं हात जोडून तात्या म्हणाला, "पण एक सांगतो पोराहो, मी परत येईस्तोवर तेंच्याकडनं काही पण मागायचं न्हाई. आणि तेंच्याशी भांडायचं न्हाई. द्या वचन मला." तोल सावरत तात्यानं उजवा हात पुढं केला.

काकीनं आणि तिन्ही पोरांनी तात्याच्या थरथरत्या हातावर हात ठेवला, तात्याच्या डोळ्यातलं पाणी हातावर पडलं. सदऱ्याच्या बाहीला डोळे पुसत तात्या निघाला !!!

हातातल्या काठीच्या आधारानं डावा पाय ओढत तात्या गावातल्या घरापुढं आला.

भिरभिरत्या नजरेनं घरापुढच्या चिंचेच्या झाडाकडं बघू लागला.

'लई जीव हुता आबाचा, या चिंचेवर. आपल्या जन्मापासूनचा साथीदार म्हणायचा. आमच्या आज्यांन लावलाय असं सांगायचा. जवा-कवा वेळ मिळायचा तवा चिंचेखालीच बसायचा, दुपारच्या टायमाला निजायचा देखील. चिंचेखाली मातीत धूळपाटी करून आबानंच आकडेमोड शिकवली. खांद्यावर घेऊन चिंचा काढायला लावायचा.'

‘आतासुद्धा हितंच असणाराय आबा.’

असे म्हणून तात्याने डोळे मिटून थरथरते हात जोडले.

"आता घरात जे काही हुईल ते सहन करायची आणि पचवायची शक्ती दे. दोनी पोरं आपलीच हाईत, चुकली असतील. त्येंची अवस्था तरी बघ. मी बोलतो त्येंच्याशी. झालेल्या चुकीवर पडदा टाक आणि माफ कर आबा, सोड त्येंचा पिच्छा."

सारे वातावरण शांत झाले, भयाण शांतता; म्हणजे आबाला हे मान्य नव्हतं. तात्याला आता काय करावं सुचना.

काहीवेळानं...

"आबा, मी समजून सांगतो दोनी पोराना. ऐकतील माझं, ऐकावंच लागल.”

तात्या झाडाकडं हात जोडून काकुळतीने बोलत होता.

“मला एक वचन दे आबा, मी या दारामधनं परत असाच बाहेर येईस्तोवर त्येंचा पिच्छा सोडीन म्हणून, त्याना त्रास देणार न्हाईस, म्हणून !!! "

आणि अचानक त्या झाडाची फांदी जोरात हलली, अगदी कुणीतरी हलवावी तशी हलली.

तात्या काय ते समजून गेला आणि तात्याच्या मनाची कळी खुलली, मनापासून हसला आणि हसत घराकडं निघाला. सदू-म्हादूच्या घराकडं ...

******

घराच्या पायऱ्या चढून आत गेला.

"आरं, तुझ्यामुळं आमच्या मागं लागल्यात आबा, मेल्यावर बी. तरी परत आलायस व्हय. अजून काय करावं म्हंतोस?" दारातून आत येणाऱ्या तात्यावर रागानं हात उगारत सदू अंगावर धावून आला.

तात्या खाली पडणार एवढ्यात, तात्याच्या नकळत मागे आलेल्या त्याच्या पोरांनी आणि काकीनं त्याला आधार दिला आणि सावरले. निपचित पडलेल्या म्हादूच्या बाजूला बसलेली माई पुढं आली आणि सदूला आवरली.

अचानक आलेल्या आपल्या दोनी पोरांकडं बघत तात्या खाली बसला.

त्याच्या वचनात बांधलेली दोन्ही पोरं त्याच्या बाजूलाच भिताडाला टेकण देऊन उभी राहिली., माई काकीला घट्ट धरून रडू लागली, म्हादूच्या बाजूला बसली.

पुढं काय होणार? कुणालाच कळेना...

सगळीजण सारवलेल्या जमिनीकडं नजर धरून शांत बसलेली.

झोपलेला म्हादू डोळ्यात जीव आणून तात्याकडं बघत होता. वाकड्या झालेल्या तोंडाने तात्या शांतपणे बोलू लागला,

"आबाला सोताहूनच ती जमीन माझ्या नावावर करायची होती, मी नको म्हणालो तरी. आतासुद्धा ती जमीन मला नको हाय. मला माहित हाय, मी ती परत केली म्हणून आबाला माझा राग येणार, पर आबाला मी सांभाळून घेईन, तुमी काळजी करू नका. तुमा पोरांहून घर, जमीन मोट्टी हाये का? फकस्त तुमी भावंडं भांडू नका, एव्हडंच करा."

असे म्हणत बंडीच्या खिशात ठेवलेली जमिनीची कागदं सदू-म्हादूच्या पुढ्यात ठेवली.

तात्या उठायचा प्रयत्न करू लागला. आपल्या पोरांकडे बघू लागला, दोन्ही पोरांनी त्याला उभा राहायाला मदत केली.

"सोडा मला." म्हणून आधारासाठी आणलेली काठी दोन्ही हातात धरून चालू लागला.

माई, सदू-म्हादू त्यांच्या बायका आणि तात्याची पोरं स्तब्ध होऊन बघत होती.

तात्या आता काय करणार कुणालाच कळत नव्हतं.

"तुमचा तात्या तुमाला कळलाच न्हाई पोराहो." बडबडत, काठीच्या आधारानं स्वतःला सावरत तो आतल्या खोलीत गेला, न्हाणीघरात गेला, आणि न्हाणीचं दार बंद करून घेतलं.

******

"तात्या, हे काय केलास तू?" आबा.

"माफ कर आबा, जे काय मी केलंय ते आपल्याच पोरांसाठी केलं!

आरं, किती बी चुकली तरी आपलीच पोरं हाईत ती. मी जसा घरात गेलो तसा कवाच परत येणार न्हाई आता, तवा मला दिलेलं वचन आता तू पाळावच लागणार.

आपली पोरं सुखी राहण्यासाठी तुला बंदी केलंय मी राजादा 'वचनबंदी'!!! "

आबाचा हात हातात घेतलेला तात्या!

आबाला चिंचेवरून दूरवर घेऊन चाललेला तात्या!!

जिथं आबा गेला, त्या न्हाणीत मळलेल्या टॉवेलात लटकलेला देह त्यागून तात्या!!!

'वचनबंदी' आबाकडं बघत हसत चालला होता!!!

--- मिलींद सीताराम कुलकर्णी 25/01/25

§§§§§

श्री, मिलिंद कुलकर्णी
यांची अत्यंत वाचनीय
तीन पुस्तके.

कव्हरवर क्लिक
करताच उघडतील.

No terms

No conditions

No money